cmyk

## संपादकीय

### विचित्र कोंडीला सरकारच जबाबदार

१४ जुलै रोजी विशाळगडाजवळील गजापूर गावात हिंसक झालेल्या जमावाने केलेली प्रचंड नासधूस आणि त्यामुळे बिघडलेली परिस्थिती हाताळताना सरकारच्या नाकी नऊ आले आहेत. त्यातच भर पावसाळ्यात अतिक्रमण हटाव मोहिम सुरू कशी केली अशी विचारणा करत मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाची कान उघाडणी केली आहे. घटना घडत असताना जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस प्रमुख बघे बनले. ट्रेकरना गडावर जाऊ देण्यासाठी सर्वांनाच सोडले ही त्यांची चूक होती. या चुकीचा जाब प्रशासकीय पातळीवर विचारला जाणार की पाठीशी घालणार? वरिष्ठांची करडी नजर असेल तर स्थानिक कणे ताठ राहतात.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### अर्थमंत्री आज सादर करणार आर्थिक सर्वेक्षण अहवाल

नवी दिल्लीः अर्थमंत्री निर्मला सीतारामन २३ जुलै २०२४ रोजी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर करणार आहेत. मंगळवारी अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी अर्थमंत्री २२ जुलै रोजी संसदेत सरकारचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर करतील. अर्थसंकल्पापूर्वी आर्थिक सर्वेक्षण सादर करण्याची परंपरा आहे. सरकारचे रिपोर्ट कार्ड म्हणून या सर्वेक्षणाकडे पाहिले जाते. या अहवालाच्या माध्यमातून सरकार गेल्या वर्षभरातील कामाचा आढावा घेऊन भविष्यातील योजना तयार करते.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–९१ सोमवार दि.२२ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# सोयाबीन, कापसाचे हेक्टरी ५ हजार कधी मिळणार?

## अर्थसंकल्पातून घोषणा करूनही सरकार निर्णय घेईना, जीआर नसल्याने प्रशासनाचे हात बांधले

पुणे । प्रतिनिधी

अर्थसंकल्पातून कापूस आणि सोयाबीनला जाहीर झालेली हेक्टरी ५ रुपयांची मदत देण्याबाबत सरकारकडू अद्याप कोणतीच कार्यवाही होताना दिसत नाही. याबाबतच जीआर न निघाल्यामुळे प्रशासनाचे हात बांधलेले आहेत. निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन राज्य शासनाने अनेक लाभाच्या योजना जाहिर केल्या. लाडकी बहिण योजनेसाठी तात्काळ जीआर काढण्यात आला मात्र शेतकऱ्यांच्या योजनेसाठी तो का काढण्यात आला नाही, असा सवाल आता शेतकरी विचारू लागले आहेत. लोकसभा निवडणूकी आगोदर पिकांच्या भावांतर बाबतही घोषणा





करण्यात आली होती, मात्र निवडणुकीत अपेक्षीत यश न मिळाल्याने ते सर्व आता गुंडाळून ठेवण्यात आले आहे. कापूस आणि सोयाबीनसाठी जाहिर झालेल्या हेक्टरी ५ हजार मदतीचेही असेच होणार की काय अशी शंका आता उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे ही मदत देण्यासाठी शेतकऱ्यांकडून अर्जही भरून घेण्याची गरज नाही किंवा जास्त वेळही लागणार नाही. कारण सरकारकडे मागच्या खरिपात किती शेतकऱ्यांनी किती हेक्टरवर कापूस घेतला आणि सोयाबीन घेतले याची माहिती



उपलब्ध आहे. सरकारला खरेच शेतकऱ्यांना मदत द्यायची की केवळ


### झुलवत ठेवण्याचा प्रकार

शासन कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना लोकसभा निवडणुकीपासून झुलवत ठेवत आहे. आधी भावांतर योजना आणि आता हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान. शेतकऱ्यांना हे अनुदान देण्यासाठी सरकारला अर्ज भरून घेण्याची गरज नाही. त्यामुळे सरकारला खरंच शेतकऱ्यांसाठी काही करायचे की केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन केवळ गाजर दाखवायचे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

निवडणुका होईपर्यंत शेतकऱ्यांना झुलवत ठेवायचे आहे? असे प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. हे प्रश्न उपस्थित होण्याला दोन कारण आहेत. पहिल कारण म्हणजे सरकारने लोकसभा निवडणुकीची आचारसंहीता लागू होण्याच्या तासभर आधी सोयाबीन आणि कापसाला भावांतर योजना जाहीर केली होती. पण भावांतर योजना केवळ निवडणुकीपुरता जुमला ठरला. कारण सरकारने ज्या काळात ही योजना जाहीर केली होती त्या काळात ही योजना राबवणे शक्य नव्हते. आपला जुमला फसल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने निवडणुका संपल्यानंतर भावांतरचा साधा उल्लेखही केला नाही. मग सरकारने अर्थसंकल्पात ◀◀ पान २ वर

## तुमचे १२ वाजायला १० मिनिटं शिल्लक

### शरद पवार गटाची सूचक पोस्ट चर्चेत



पुणे । प्रतिनिधी

शरद पवार गटाने अजित पवार यांचा हातात घड्याळ घेतलेला फोटो पक्षाच्या सोशल मीडिया प्लेटफॉर्म एक्स अकाउंटवरून शेअर केला आहे. यामध्ये अजित पवार यांच्यावर पक्षाच्या घड्याळ चिन्हावरून टोला लगावला आहे. ही पोस्ट चांगलीच चर्चेत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, स्वतः कमावलेल्या आणि हिसकावून घेतलेल्या गोष्टीत फार फरक असतो. त्यामुळेच तुम्ही हिसकावून घेतलेले चिन्हं सुद्धा तुमचे १२ वाजायला १० मिनिटं शिल्लक ◀◀ पान २ वर

# शरद पवार भ्रष्टाचाराचे महामेरू, तर उद्धव ठाकरे औरंगजेबचे फॅन

## भाजपाच्या पुणे अधिवेशनात अमित शाह यांचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

संपूर्ण देशात भ्रष्टाचाराचा मेहामेरू कोणी असेल तर ते म्हणजे शरद पवार हे असून सरकारी संस्थांच्या माध्यमातून भ्रष्टाचाराच्या करण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यामुळे संपूर्ण देशभरात त्यांची ओळख भ्रष्टाचारी म्हणून आहे. महाराष्ट्रात औरंगजेबचे फॅन क्लब चालविणारे काहीजण आहेत. या औरंगजेब फॅन क्लबचे प्रमुख उद्धव ठाकरे हे असून नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत त्यांच्या फॅन क्लबनेच उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला मतदान केल्याची खोचक टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली.



विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या कार्यकर्त्यांचे अधिवेशन पुण्यात पार पडले. या अधिवेशनाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना अमित शाह यांनी महाविकास आघाडी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर यथेच्छ टीका केली. अमित शाह पुढे बोलताना म्हणाले की, लोकसभा निवडणूकीच्या दरम्यान महाविकास आघाडी आणि इंडी आघाडीच्या नेत्यांनी भाजपा आणि मोदी यांच्या विरोधात फेक नॅरेटीव्हच्या माध्यमातून भाजपाचे सरकार राज्यघटना ◀◀ पान २ वर

### अमित शहा यांची भाषा अत्यंत थिल्लर–ठाकरे गट

अमित शहा यांच्या टीकेला शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या की, अमित शाह यांनी पुण्यामध्ये येऊन जी मुक्ताफळे उधळली त्यावरून दोन मुद्दे नक्कीच स्पष्ट झाले, त्यातला पहिला भाग म्हणजे, आजही अमित शहा यांना महाराष्ट्रात आल्यानंतर आपले भाषण चुरचुरीत करण्यासाठी जाणीवपूर्वक उद्धव ठाकरे यांचे नाव घेतल्याशिवाय भाषण सुरूही करता येत नाही आणि संपवताही येत नाही. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की तुमच्या समोर महाराष्ट्रातले सगळ्यात मोठे आव्हान हे उद्धव बाळासाहेब ठाकरे या नावाचे आहे. ज्या पद्धतीची अत्यंत थिल्लर भाषा शाह यांनी वापरली, त्यावरून तुम्ही हे सप्रमाण सिद्ध केले की, पार्लमेंटमध्ये तुमच्या पक्षाचे खासदार रमेश बिधुरी यांनी जी सवंग भाषा वापरली होती, त्याच्याही पेक्षा अधिक खालचा स्तर अमित शहा यांनी पुण्यामध्ये येऊन गाठला.

### राहुल गांधी यांना पहिला ओमन चंडी सार्वजनिक सेवक पुरस्कार जाहीर

कोच्चीः काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना पहिला 'ओमन चंडी सार्वजनिक सेवक पुरस्कार' जाहीर झाला आहे. हा पुरस्कार



केरळचे माजी मुख्यमंत्री दिवंगत ओमन चंडी यांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आला असून राहुल ◀◀ पान २ वर

## छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील रखडलेली कर्जमाफी मिळणार!

पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारने २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत २५ हजार रुपये प्रोत्साहन अनुदानापासून पात्र; पण तांत्रिक मुद्यामुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना पैसे देण्याच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत.

राज्य सरकारने त्यावेळची माहिती मागवली असून, दोन दिवसांत जिल्हा बँकेकडे संबंधित शेतकऱ्यांची नावे पाठवण्याचे आदेश सहकार विभागाने दिले आहेत. त्यानुसार सुमारे २२ हजार शेतकऱ्यांना २५ हजार रूपयांपर्यंतचा लाभ



मिळू शकतो. केंद्र सरकारच्या थकीत पीक कर्ज माफ योजनेनंतर राज्य सरकारने २०१७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना आणली होती. यामध्ये थकबाकीदार शेतकऱ्यांना ५० हजार रूपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ, पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २५ हजार रूपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान, तर ५० हजार रुपयांच्या वरील थकीत पीक कर्जासाठी 'ओटीएस' योजना प्रभावीपणे राबवली होती. राज्यात २०१९ नंतर महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणली. यामध्ये दोन लाखांपर्यंतचे थकीत कर्ज माफ व पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रूपयांपर्यंत अनुदान देण्यात आले. या प्रोत्साहन अनुदानाचे भिजत ◀◀ पान २ वर

## विधानसभा एकत्र, पण महापालिका स्वतंत्र लढणार

### अजित पवारांची पुण्यातून घोषणा

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुका आपण एकत्र लढलो, आता विधानसभा निवडणुकाही एकत्रच लढणार आहोत. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्र लढायच्या आहेत, अशी घोषणा राष्ट्रवादीचे राष्ट्रीय नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. त्यामुळे, महायुती ही केवळ विधानसभेपुरतीच असल्याचे स्पष्ट झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात राजकीय पक्ष स्वतंत्र मैदानात उतरणार असल्याचे दिसून येते आहे.

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील



सर्वच पक्ष एकत्रितपणे निवडणुका लढवण्यावर ठाम आहेत. महायुतीकडून सध्या पक्षांचे मेळावे घेतले जात आहेत, पण या मेळाव्यातूनही ते महायुतीचेच सरकार येणार, महायुतीच जिंकणार असल्याचा दावा करत आहेत. रविवारी पिंपरी चिंचवडमधील मेळाव्यातून अजित पवारांनी तुफान बॅटिंग केली. पिंपरी चिंचवड, पुणे शहर आणि ग्रामीण असे मेळावे घ्यायचे होते, पण ग्रामीण मेळावा होऊ शकला नाही, असे म्हणत अजित पवारांनी पिंपरीच्या मेळाव्यातील भाषणाला सुरुवात केली. आज गुरुपौर्णिमा आहे, मी सर्व गुरूंना वंदन करतो. काही अफवा पसरवल्या जातात, पुण्यात दीपक मानकर आणि पिंपरीमधील ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.०० क्विंटल | २,३०० | ३,३०० | २,७०५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६९.५० क्विंटल | २,००१ | २,७१० | २,३२२ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ३.५० क्विंटल | ५,००० | १०,४५० | ७,७२५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,३०० | ३,५०० | २,६६५ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ६२.५० क्विंटल | ४,४६० | ४,४६० | ४,४६० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०१ | ५,८५० |

# भारताचे ऐतिहासिक यश...!

## चांद्रयान–३ मोहीमेला जागतिक अंतराळवीर पुरस्कार

नवी दिल्ली। वृतसंस्था

भारताने चांद्रयान–३ या अंतराळयानाचे २३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्रावर यशस्वी लँडिंग केले. या अंतराळ मोहीमेच्या यशाची आंतरराष्ट्रीय अंतराळवीर महासंघाकडून दखल घेत, जागतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. इटलीतील मिलान येथे सोमवार १४ ऑक्टोबर रोजी ७५ वी आंतरराष्ट्रीय अंतराळवीर परिषद होणार आहे. या परिषदेत चांद्रयान–३ या मोहिमेला हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

भारताच्या चांद्रयान–३ मोहीमेने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे पाऊल टाकत नवीन इतिहास घडवला. भारताच्या अंतराळ संशोधन संस्थेने प्रथमच चांद्रयान–३ मोहीमेच्या माध्यमातून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर तिरंगा फडकवला. या ऐतिहासिक यशामुळे जगभरात भारताचा डंका वाजला. भारताच्या या यशाची दखल जागतिक पातळीवर प्रथमच दखल घेण्यात आली असून, चांद्रयान–३ मोहीमेला जागतिक दर्जाचा जागतिक अंतराळ पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याविषयी माहिती देताना इंटरनॅशनल एस्ट्रोनॉटिकल फेडरेशनने सांगितले की, भारताशिवाय आतापर्यंत अमेरिका, रशिया आणि चीन चंद्रावर उतरले आहेत. इस्रोचे चांद्रयान–३ हे वैज्ञानिक प्रयोग आणि किफायतशीर अभियांत्रिकीचे अनोखे उदाहरण आहे. ◀◀ पान २ वर

### जागतिक स्तरावर भारताने इतिहास घडवला

भारताने पाठवलेल्या चांद्रयान–३ ने २३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या दक्षिणेकडील पृष्ठभागावर यशस्वी लँडिंग केले. देशाच्या इतिहासातील हा अभिमानाचा क्षण होता. चांद्रयान ३ मोहिमेच्या यशामागे, त्याचे प्रकल्प संचालक पी वीरामुथुवल आणि इस्रोमधील त्यांच्या टीमने रात्रंदिवस काम केले. यापूर्वी भारताने चांद्रयान–१ आणि चांद्रयान–२ प्रक्षेपित केले होते. मात्र तो यशस्वी होऊ शकले नाही. यानंतर चांद्रयान–३ पाठवण्यात भारताने यश मिळवत, जागतिक अंतराळ मोहिमांमध्ये नवीन इतिहास घडवला आहे.



cmyk

अग्रलेख

# विचित्र कोंडीला सरकारच जबाबदार

१४ जुलै रोजी विशाळगडाजवळील गजापूर गावात हिंसक झालेल्या जमावाने केलेली प्रचंड नासधूस आणि त्यामुळे बिघडलेली परिस्थिती हाताळताना सरकारच्या नाकी नऊ आले आहेत. त्यातच भर पावसाळ्यात अतिक्रमण हटाव मोहिम सुरू कशी केली अशी विचारणा करत मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाची कान उघाडणी केली आहे. घटना घडत असताना जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस प्रमुख बघे बनले. ट्रेकरना गडावर जाऊ देण्यासाठी सर्वांनाच सोडले ही त्यांची चूक होती. या चुकीचा जाब प्रशासकीय पातळीवर विचारला जाणार की पाठीशी घालणार? वरिष्ठांची करडी नजर असेल तर स्थानिक कणे ताठ राहतात. कोल्हापूरात दोन वर्षात पन्हाळगड दर्गा उद्धवस्थ प्रकरण आणि कोल्हापुरातील दंगा होऊनही गजापूर घटना घडली. राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक स्वत: याचा जाब विचारतील का? या प्रश्नाला आता तरी उत्तर नकारार्थीच आहे.

निवडणुका जवळ येतील तसे राजकारणी बेजबाबदारपणाचे दर्शन घडवत आहेत. प्रशासनातील दोन ज्येष्ठ आणि निवृत्त व्यक्तिमत्त्व पानिपतकार विश्वास पाटील आणि ज्येष्ठ सनदी अधिकारी महेश झगडे यांनी नुकतेच विशाळगड आणि आरक्षण तणावावर भाष्य केले आहे. ते विचारात घेण्यासारखेच. विशाळगडावर जुने बांधकाम आणि अतिक्रमण कोणते ते ठरवणे प्रशासनास अवघड नव्हते. इंग्रजांच्या गॅझेटमधून ते शोधणे सहज शक्य होते. हे विश्वास पाटील यांचे म्हणणे योग्यच. पूर्वी आंदोलन झाल्यानंतर किंवा माजी खासदार संभाजीराजे यांनी इशारा दिल्यावर जिल्हा प्रशासनाने शांतता बैठक घेऊन विषय हाताळला पाहिजे होता. अतिक्रमणांच्या बाबतीतील सर्व वस्तुस्थिती दोन्ही बाजूच्या लोकांसमोर मांडली पाहिजे होती. प्रशासन कोणती बांधकामे हटवणार ते निश्चित केले पाहिजे होते. या प्रकरणात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना मध्यस्थीसाठी बोलावण्याचे आवाहन खा. शाहू महाराज यांनी केले होते. त्यांच्या ज्येष्ठत्वाचा उपयोग केला पाहिजे होता. स्थानिकांना शक्य नसेल तर वरिष्ठांनी हस्तक्षेप केला पाहिजे होता. त्यांनी दुर्लक्ष केले. पावसाळ्यानंतर अतिक्रमणे हटवायचा शब्द देऊनही आंदोलन थांबले असते. आता राज्यभर गावोगावी पोलीस मार्च काढून आणि बुटाचा आवाज लोकांना ऐकवून काय साध्य होणार? २० वर्षे प्रतापगडावरील अफजल खान थडग्याच्या बाबतीतही बोटचेपी भूमिका अनुभवास आली होती. वाई प्रांत यांनी जर शिवकालीन बांधकामाची गॅझेटमध्ये जशी नोंद होती तसे बांधकाम करून घेऊन भोवतीचे अतिक्रमण हटवले असते तर उच्च न्यायालयाला त्यासाठी आदेश द्यायची आणि प्रत्येकवर्षी तणावाच्या स्थितीची वेळ आली नसती. या गदारोळात शासन, प्रशासनाच्या कृतीकडे दुर्लक्ष होते आणि त्यांचे फावते. कोल्हापूर प्रकरणी त्यामुळेच सरकार बरोबरच प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही जाब विचारला गेला पाहिजे. राज्याचे प्रमुख रात्रीत कोल्हापूरला येऊन गेले. त्यामुळे त्यांना हे प्रश्न विचारायचे राहिले. तिकडे मराठवाड्यात मराठा विरुद्ध ओबीसी असा तणाव गावोगावी पाहायला मिळत आहे. ऐन लोकसभा निवडणुकीत त्यात वाढ झाली आणि जिथे ज्या समाजाची लोकवस्ती अधिक तिथे त्यांनी दुसऱ्यांवर सामाजिक, आर्थिक बहिष्काराचे अस्त्र उगारले. परिणामी बीड जिह्यात वंजारी विरुद्ध मराठा असा टोकाचा विरोध दिसून आला. आता पुन्हा तणाव वाढत आहे. मंत्री छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांच्यातील वाद सर्वश्रुत होताच. पण, गेल्या दोन दिवसांपासून भाजप आमदार प्रसाद लाड आणि मनोज जरांगे यांच्यात वाद धुपायला लागला आहे. एका बाजूला सत्तेतील एक-दोन पक्षांनी आंदोलकांशी चर्चा करायची आणि दुसरीकडे त्यांच्यातील उर्वरित काहींनी आंदोलकांना चिडीस पाडायचे या खेळातून नेमके साधले काय जाते? लाड यांच्यावर जरांगे पाटील यांनी ज्या भाषेत टीका केली ती समर्थनीय नाही. पण, त्यांना चिडवल्याने वाद हिंसक वळणावर जाणार नाही का? महेश झगडे यांनी राज्यातीलच नव्हे तर देशाच्या आरक्षणाची सध्याची स्थिती काय आहे, त्यातून नोकऱ्यांची शक्यता किती कमी झालेली आहे आणि मराठा आरक्षण द्यायचे झाले तर ते प्रचलित व्यवस्थेत देताना कोणते अडथळे आहेत याची जाणीव राज्याच्या प्रशासन प्रमुखांनी करून देणे आणि आपल्या तीन दशकांच्या प्रशासकीय अनुभवाचा उपयोग असे वाद हाताळण्यासाठी केला पाहिजे असे म्हटले आहे. ते योग्यच आहे. मात्र, आता प्रकरण खूप पुढे गेले आहे. राज्य सरकारने नेमलेल्या आयोगाने आतापर्यंत तीन वेळा मराठा आरक्षण देऊन झाले आहे. दोनदा ते कोर्टात फेटाळले जाऊन तिसऱ्यांदा पुन्हा दिले गेले आहे. दुसरीकडे मराठवाड्यातील मराठ्यांच्या कुणबी अशा नोंदी असल्याचे दाखले लाखोच्या संख्येने निघाले आहेत. आता त्यांनी आपल्या हक्काचे आरक्षण ओबीसीमध्येच आहे आणि ते त्यातूनच मिळाले पाहिजे असा आग्रह धरताना सगेसोयरेचा मुद्दा पुढे आणला आहे. सरकारने त्यालाही होकार दिला आहे आणि त्याविरोधातील लक्ष्मण हाके यांचे उपोषण सोडवताना ओबीसींच्या हक्काचे आरक्षण इतरांना देणार नाही असाही शब्द दिला आहे. हे दोन्ही शब्द एकाचवेळी सरकार कसे पाळू शकणार आहे? उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आरक्षण देतात आणि विद्यमान न्यायाधीश ते डावलतात. पुन्हा त्यांनी सांगितलेली ट्रीपल टेस्टची अट पूर्ण करून आरक्षण दिल्याचे सरकार म्हणते. असेच म्हणणाऱ्या बिहार सरकारचे आरक्षण न्यायालयाने फेटाळले आहे. त्यातून जी विचित्र कोंडी निर्माण झाली ती सावरणार कोण आणि हा तणाव आवरणार कोण?

# राष्ट्रहितासाठी नेतृत्वगुण विकसित करा-गोरक्षनाथ आबुज

## सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचे नेतृत्व गुणविकास शिबिर विविधांगी पाच सत्रांमध्ये संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

**कोणतेही काम केले तर ते आवडीने केले पाहिजे, तरच त्या कामाची गुणवत्ता वाढते. ध्येय प्राप्तीसाठी गुणवत्ता आणि सृजनशीलता अत्यंत आवश्यक आहे. ज्या कामाने सर्वांचे भलं होईल असे काम करा, स्वत:च्या चारित्र्याबरोबरच देशाचे चारित्र्य मोठे करण्यासाठी, तसेच राष्ट्रहितासाठी स्वत:मधील नेतृत्वगुणाचा विकास करावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे सदस्य तथा इतिहासाचे अभ्यासक गोरक्षनाथ आबुज यांने केले.**

येथील सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित नेतृत्व गुण विकास शिबीराच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते.पुढे ते म्हणाले की,प्रत्येकाचे गुण वेगळे आहेत,बुद्धी वेगळी आहे पण तरीही कार्य असे करा की,ज्या कार्याने समाजाचे,पर्यायाने राष्ट्राचे भले होईल व राष्ट्रहिताचे आपले ध्येय साध्य होईल. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर यांनी या शिबीराचा उद्देश सांगतांना म्हटले की,प्रत्येक युगात नेतृत्वाची गरज भासलेली आहे,देशाला अग्रेसर ठेवण्यासाठी खंबीर नेतृत्वाची गरज असते आणि ही राष्ट्राची गरज ओळखून आपल्या संस्थेने राष्ट्राच्या सक्षम नेतृत्वासाठी आपल्या विद्यार्थ्यांनी सक्षम बनावे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूत या नेतृत्व गुणविकास शिबीराचे प्रयोजन केल्याचे सांगितले. केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा उद्घाटक अमरनाथ खुर्पे यांनी शिबीराचे उद्घाटन करतांना म्हटले की, 'मनुष्य घडवण्याचे कार्य आपली संस्था करते तसेच समाजहितासाठी



आवश्यक असणाऱ्या प्रत्येक बाबींची रुजवणूक आपल्या संस्कार केंद्रातून होते. दुसऱ्या सत्रात मंडळशः बैठकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्या त्या मंडळाची उद्दीष्टे व श्रम निष्ठा या विषयावर विविध मान्यवरांच्या द्वारे मार्गदर्शन करण्यात आले. भोजन सत्रानंतर चौथ्या सत्रात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने यावर्षी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी निमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारीत विद्यार्थ्यांनी बसवलेली नाटीका सादर केली तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेच्या शताब्दी वर्षानिमित्त प्रा. गजानन होन्ना यांनी सेवा व संघ विचारधारा याविषयी शिबीरार्थींना मार्गदर्शन केले. समारोप सत्रात प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले राधाकृष्ण मुळी यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची माहिती देताना प्रामुख्याने वेळचे महत्व सांगितले. अध्यक्षीय समारोपात या सत्राचे अध्यक्ष प्रशांत भानप यांनी विद्यार्थ्यांना आजच्या गुरू पौर्णिमेच्या योगाचे व शिबीराचे महत्व सांगताना ध्येयप्राप्तीमध्ये असणाऱ्या अडथळ्यांना दूर करण्याची अपेक्षा व्यक्त केली. तर समारोप सत्राचे अध्यक्ष प्रकाश दुगड यांनी नेतृत्व गुण विकास शिबीराचा इतिहास सांगतांना चारित्र्यवान नेतृत्त्वासाठी या शिबीराचे आयोजन असल्याचे सांगितले. यावेळी शिबीराच्या निरीक्षक सौ. सारिका रामदासी , शाळेचे उपमुख्याध्यापक तथा शिबीर प्रमुख विठ्ठल काळे, पर्यवेक्ष रविंद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, श्री.परमेश्वर आदमाने कार्यक्रम प्रमुख सौ.अपर्णा मुळे तसेच सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व शिबीरार्थी विद्यार्थी उपस्थित होते. संगीत विभागाचे श्री.चैतन्य आहेर यांनी सांघिक पद्य तसेच पसायदान सांगितले तर वैयक्तिक पद्य कु.श्रेया ढेंगे , कु.धनश्री पटवी यांनी गायले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. शर्वरी यादव, कु. शरयु तुपकरी, कु. अंकिता पवार, कु. राशी गडम, कु. स्वरा गायकवाड यांनी केले तर आभार विठ्ठल काळे व श्रीमती अंजली वाघमारे यांनी मानले तर कल्याण मंत्र कु.स्वरा कुलकर्णीने सांगीतला.

# माजलगाव विधानसभेसाठी अ‍ॅड. सुभाष राऊत यांच्या नावाची जोरदार चर्चा

**माजलगाव । प्रतिनिधी**

देशाचे नेते,मंत्री छगनराव भुजबळ साहेब यांचे खंदे समर्थक निकटवर्तीय असलेले व भुजबळ साहेबांचे अत्यंत विश्वासू व बहुजन,ओबीसी समाजासाठी सातत्याने लढणारे ओबीसी नेते म्हणून ऍड.सुभाष राऊत यांची ओळख आहे, गेल्या अनेक वर्षापासून ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी दिवस रात्र सातत्याने लढा उभारणारे व त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने रस्त्यावरची लढाई लढणारे व बीड जिल्ह्यातील ओबीसींचे नेते ओळख निर्माण करणारे अँड सुभाष राऊत एकच नाव आहे.अँड सुभाष राऊत यांचा संपर्क दांडगा असून बहुजन,ओबीसी,समाजासह मुस्लिम, दलित,बंजारा,वंजारी,धनगर, माळी समाजात असलेला दांडगा संपर्क तसेच मागील काही वर्षापासून चळवळीत राहून सक्षमपणे काम करत सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देणे हे एकच ध्येय ठेवून काम करत आहेत, गेल्या अनेक वर्षापासून केलेल्या सामाजिक कार्याची



पोचपावती म्हणून अँड सुभाष राऊत यांची आगामी माजलगाव विधानसभा निवडणुकीत प्रबळ उमेदवार असल्याची जोरदार चर्चा रंगू लागल्याने सत्ताधारी पक्षातील लोकांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीचे लवकरच बिगुल वाजणार असून सर्वच राष्ट्रीय पक्षांची उमेदवारासाठी चाचणी सुरू झाली असून माजलगाव मतदार संघात ओबीसीचे लढवली नेते अँड सुभाष राऊत यांच्या नावाची जोरदार चर्चा सखल ओबीसी, बहुजन समाज सह ग्रामीण व शहरी भागात त्यांच्याच नावाची चर्चा जोरदार सुरू आहे, बहुजन, ओबीसी,मुस्लिम दलित, बंजारा, वंजारी धनगर,माळी समाजात त्यांच्या नावाची एकच चर्चा सुरू झाल्याने येणाऱ्या विधानसभेमध्ये अँड सुभाष राऊत यांच्या विजयाचा गुलाल निश्चित असल्याचे बोलले जात आहे.

# तंबाखू मुक्त शाळा याअभियानांतर्गत गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांची जिल्हा स्तरीय कार्यशाळा

**बीड । प्रतिनिधी**

**पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या अभियान अंतर्गत जिल्हा परिषदेमधील इयत्ता पहिली ते आठवी विद्यार्थ्यांची भाषा व गणित विषयाचा अध्ययन स्तर निर्धारण करणेबाबत तसेच तंबाखूमुक्त शाळा करणेबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे दिनांक २२ जुलै २०२४ रोजी सकाळी साडेदहा वाजता के एस के कॉलेज बीड येथे विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी दिली आहे**

या कार्यशाळेसाठी बीड जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व शिक्षण विस्तार अधिकारी, व सर्व केंद्रप्रमुख यांनी सदर कार्यशाळेला पूर्णवेळ उपस्थित राहण्याची सूचना शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी दिल्याआहेत या कार्यशाळेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील ,शिक्षण अधिकारी (प्रा) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी( यो)संजय पंचगले व शिक्षणाधिकारी(मा)नागनाथ शिंदे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे, अधीक्षक बाळासाहेब वीर , रंगनाथ राऊत हे मार्गदर्शन करणार आहेत. याच बैठकीत तंबाखूमुक्त जिल्हा करण्यासाठी सलाम मुंबई फाऊंडेशनचे राकेश कसारे व प्रशांत उबाळे हे विशेष मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती जिल्हा समन्वयक तथा शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम पवार यांनी दिली आहे. सदरील कार्यशाळा सोमवारी दिनांक २२ जुलै २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता के एस के कॉलेज बीड येथे संपन्न होणार आहे होणार आहे. जिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षण विस्तार अधिकारी ,सर्व केंद्रप्रमुख यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी( प्रा.) भगवान फुलारी शिक्षणाधिकारी (मा)नागनाथ शिंदे व शिक्षणाधिकारी (यो)संजय पंचगले यांनी केले आहे.

पान १वरून...

### सोयाबीन, कापसाचे हेक्टरी

कापूस आणि सोयाबीनला २ हेक्टरच्या मर्यादेत हेक्टरी ५ हजार रुपये मदत जाहीर केली. पण लाडकी बहीण योजनेविषयी आतापर्यंत ५,६ जीआर काढणाऱ्या सरकारने या मदतीचा साधा एकही जीआर काढला नाही. जीआर आला नसल्याने सरकार ही मदत कशी देणार याविषयी अजूनही अनेक प्रश्न आहेत. सरकारने एका शेतकऱ्याला २ हेक्टरच्या मर्यादेत कापूस आणि सोयाबीनला ५ हजार रुपयांची मदत देणार असल्याचे जाहीर केले. पण कापूस आणि सोयाबीन ही दोन्ही पीके घेणाऱ्या शेतकऱ्यांना कापसाला २ हेक्टरसाठी आणि सोयाबीनला २ हेक्टरसाठी असे ४ हेक्टरसाठी मदत मिळणार की केवळ कापूस किंवा सोयाबीनला २ हेक्टरसाठीच मदत मिळणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. याही बाबत सरकारकडून काही स्पष्टता होत नाही.

---------

### शरद पवार भ्रष्टाचाराचे

बदलणार, दलित, आदिवासी समुदायाला मिळणारे आरक्षण बंद करणार असल्या खोट्या गोष्टींचा प्रचार केला. त्यामुळे आम्हीही या फेक नॅरेटीव्हला उत्तर देण्याचा प्रयत्न करण्याच्या फंदात पडलो. मराठा आणि ओबीसी आरक्षणाबाबत बोलताना अमित शाह म्हणाले की, राज्यात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. मात्र भाजपाचे सरकार आल्यानंतर मराठा समाजाला आरक्षण मिळाले. पुन्हा शरद पवार यांचे सरकार आले तर मिळालेले आरक्षण जाते अशी उपहासात्मक टीकाही यावेळी त्यांनी केली. लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने झालेल्या प्रचारा दरम्यान आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्या वेळी पंतप्रधान पदाची शपथ द्यायची असा पण केला. त्यानुसार एकट्या भाजपाला आपण २४० जागा मिळवून दिल्या आणि रालोआतील घटक पक्षांच्या पाठिंब्यांच्या आधारे २८० हून अधिक जागा मिळवित केंद्रात सलग तिसऱ्यांदा मोदीचे नेतृत्व मान्य केले. एखाद्याने विजय मिळविला तर त्याच्यात अहंकार निर्माण होतो. मात्र राहुल गांधी यांच्या पक्षाला आणि त्यांच्या इंडी आघाडीला २४० ही जागा मिळविता आल्या नाहीत. ना त्यांना केंद्रात सत्ता स्थापन करण्याची संधी मिळाली. तरीही राहुल गांधी यांच्यात अहंकार असल्याचा आरोपही यावेळी केला. शेवटी बोलताना अमित शाह म्हणाले की, ज्या प्रमाणे केंद्रात मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे सरकार स्थापन केले. त्याचधर्तीवर महाराष्ट्रातही महायुतीचे सरकार पुन्हा एकदा आणायचे असल्याने येथे आलेल्या भाजपा कार्यकर्त्ये, पदाधिकारी यांनी इथून गेल्यानंतर आपल्या मतदारांपर्यंत, बुथ लेव्हल पर्यंतच्या कार्यकर्त्यांपर्यत पुन्हा महायुतीचे सरकार राज्यात आणायचे असल्याचा निर्धार करायचा असल्याचे यावेळी सांगितले. यावेळी अमित शाह यांनी मागील १० वर्षात केंद्रात राम मंदीर, ३७० कलम आणि भारतीय नागरिकत्व कायदा आदी गोष्टी केल्याचे सांगितले.

------------

### तुमचे १२ वाजायला

आहे दाखवतय. राष्ट्रवादी पक्ष फुटल्यानंतर शासकीय कार्यक्रमात दोन्ही पवारांनी एकमेकांकडे बघणे देखील टाळले. मात्र, दोन्ही पवार पुण्यात शनिवारी (दि.२० जुलै) जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीच्या निमित्ताने एकत्र आले होते. या प्रसंगी ते प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात बोललेही; याची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली होती. बैठकीत खासदार शरद पवार, सुप्रिया सुळे यांनी विचारलेल्या प्रश्नांना उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी उत्तरेही दिली.

----------

### विधानसभा एकत्र, पण

कार्यकर्ते सोबत आहेत. विकासासाठी आपण निर्णय घेतला, विरोधी पक्षात राहून आंदोलन करुन विकास होत नाही, प्रश्न सुटत नाही. काहीजण गेले, त्यांना स्वातंत्र आहे. आपल्याला पुणे शहरात जोमाने काम करावे लागणार आहे, वेळ फार कमी आहे. आपल्या सगळ्या वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घेतला आणि आपण इथपर्यत पोहचलो. अनेकजण पक्षात आले आहेत, त्यांचे स्वागत करतो. अंदाज आहे की विधानसभा निवडणुका ऑक्टोबर शेवटापर्यंत किंवा नोव्हेंबर पहिला आठवड्यात होतील, असे अजित पवारांनी म्हटले. मात्र, त्यासोबतच, लोकसभा- विधानसभा आपण एकत्र लढत असलो, तरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आपण स्वबळावर लढायच्या आहेत, अशी घोषणाच कार्यकर्त्यांसमोर अजित पवारांनी केली. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुती एकत्र नसणार असल्याचे स्पष्ट होताना दिसत आहे.

----------

### छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान

घोंगडे कायम असताना आता राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत वंचित शेतकऱ्यांची माहिती मागवली आहे. सहकार विभागाने जिल्हा बँकेच्या माध्यमातून विकास संस्थांकडून या शेतकऱ्यांची माहिती मागवली आहे. सोमवार (दि. २२) पर्यंत ही माहिती सहकार विभागाला देण्याचे नियोजन बँकेचे असून, त्यादृष्टीने सूचनाही संबधितांना देण्यात आल्या आहेत. विधानसभा आचारसंहितेपूर्वी या वंचित शेतकऱ्यांना लाभ देता येईल का? याची चाचपणी करून निर्णय होण्याची शक्यता आहे.

**छ. शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना : २०१७**

कर्ज माफीचे खातेदार २०,२८२

रक्कम ७१.१८ कोटी

प्रोत्साहन खातेदार १,७६,०३६

रक्कम २८६.१९ कोटी

ओटीएस पात्र खातेदार १,२७८

रक्कम १६.४३ कोटी

**महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना : २०१९**

कर्ज माफीचे खातेदार ४७,८३९

रक्कम २८५.१२ कोटी

प्रोत्साहन खातेदार १,७७,७८९

रक्कम ६४६.३६ कोटी.

---------

### राहुल गांधी यांना पहिला ओमन चंडी सार्वजनिक

गांधी त्याचे पहिले मानकरी ठरले आहेत. 'ओमन चंडी फाऊंडेशन' ने रविवारी या पुरस्काराची घोषणा केली. मिळालेल्या माहितीनुसार, पुरस्कार विजेत्याला एक लाख रुपये आणि प्रसिद्ध कलाकार आणि चित्रपट निर्माते नेमम पुष्पराज यांनी बनवलेली मूर्ती दिली जाईल. फाउंडेशनने एका निवेदनात म्हटले की, राहुल गांधी हे राष्ट्रीय नेते आहेत आणि त्यांनी 'भारत जोडो यात्रे'द्वारे लोकांच्या समस्या जाणून त्यावर उपाय शोधले. दरम्यान, पुरस्कार विजेत्या राहुल गांधींची निवड काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ ज्युरीने केली आहे. केरळचे १० वे मुख्यमंत्री ओमन चंडी यांचे गेल्या वर्षी १८ जुलै २०२३ रोजी बंगळुरुच्या चिन्मय मिशन रुग्णालयात निधन झाले. २००४-२००६ आणि २०११-२०१६ दरम्यान ओमन चंडी केरळचे मुख्यमंत्री होते. यासोबतच ते २००६ ते २०२१ दरम्यान केरळमध्ये विरोधी पक्षनेतेही होते. राज्यातील सर्वाधिक काळ आमदार राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर होता. याशिवाय ओमन चंडी हे एकमेव भारतीय मुख्यमंत्री आहेत, ज्यांना संयुक्त राष्ट्राने सार्वजनिक सेवेसाठी सन्मानित केले होते.

-------------

### भारताचे ऐतिहासिक

हे भारताच्या अवकाश संशोधनाच्या प्रचंड क्षमतेचे प्रतीक आहे. महासंघाने पुढे म्हटले आहे की, चांद्रयान-३ ने चंद्राची रचना आणि भूगर्भशास्त्रातील न पाहिलेले पैलू उघड केले आहेत. हे मिशन नवीन प्रयोगासाठी जागतिक यश असल्याचे देखील महासंघाने स्पष्ट केले आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) प्रमुख एस. सोमनाथ यांनी चांद्रयान-३ मोहिमेच्या यशाचे श्रेय सर्व शास्त्रज्ञांना दिले होते. चांद्रयान-३ मोहिमेच्या या यशात देशाच्या अंतराळ संस्थेत नेतृत्व करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या अनेक पिढीच्या योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला. येत्या काही वर्षांत स्पेस एजन्सी अशाच प्रकारे मंगळावर यान उतरवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# तथ्य असल्याशिवाय अमित शाह बोलणार नाहीत : मुंडे

**अहमदनगर। प्रतिनिधी**

**भारताच्या राजकारणात सर्वात जास्त भ्रष्टाचारी शरद पवार आहेत. राज्यात शरद पवार यांनी भ्रष्टाचाराच्या संस्था तयार केल्यात. आम्ही २०१४ ला मरठ्यांना आरक्षण दिले. सरकार कुणाचे आले आणि आरक्षण गेले? आता पुन्हा आम्ही सत्तेत आलो आणि आरक्षण आले. त्यामुळे आरक्षणासाठी भाजपचे सरकार यायला हवं. यांची सत्ता आली तर आरक्षण गायब होईल'', अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुण्यातील भाजपच्या मेळाव्यात घेतली होती. याबाबत आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**



अमित शाह बोलल्यानंतर मी उत्तर देणं योग्य नाही, मात्र काहीतरी तथ्य असल्याशिवाय अमित शहा बोलणार नाहीत, असं धनंजय मुंडे म्हणाले आहेत. ते अहमदनगरमध्ये बोलत होते. मुंडेंनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने घेतले साई समाधीचे दर्शन घेतले. अनेक वर्षांनंतर धनंजय मुंडे साई दर्शनाला आले होते. धनंजय मुंडे म्हणाले, स्वर्गीय गोपीनाथ मुंडे हे माझे राजकीय गुरू आहेत. मात्र अजित पवार यांनी मला अतिशय कठीण प्रसंगात राजकीय आधार दिला. गुरू आणि मोठे बंधू म्हणून अजितदादांनी मला इथपर्यंत पोहचवले. माझे खरे गुरू अजित पवारच आहेत. स्वबळाच्या चर्चा फक्त माध्यमांमध्ये आहेत. महायुतीतील कोणताही पक्ष स्वबळावर निवडणुक लढवणार नाही. आम्ही एकत्र लढणार यात तीळमात्र शंका नाही. भाजप त्यांच्या जागांसंदर्भात निर्णय घेईल असेही मुंडे यांनी सांगितले. विशालगडाच्या प्रकरणानंतर शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांनी कोणतही वक्तव्य केलं नाही. उध्दव ठाकरे धारावी संदर्भात अनेक आरोप करतात. धारावी अडाणींच्या खिशात घालण्याचा प्रयत्न महायुती करतेय असा आरोप त्यांनी केला. तुम्ही मुख्यमंत्री असताना शेकलीन नावाच्या कंपनीला तुम्हीच काम दिलं होते. ते रद्द कुणाच्या काळात झालं आणि अडाणींना दिलं याचा अभ्यास माध्यमांनी करावा. धरावीच्या पूर्वीच्या टेंडर प्रक्रियेबाबत उध्दव ठाकरेंनी उत्तर द्यावं. आमचा उपयोग फक्त लोकसभेसाठी केला आणि वा-यावर सोडले हे आता मुस्लिम समाजच म्हणतोय, असेही मुंडे यांनी सांगितले.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. २२ जुलै २०२४



## श्री क्षेत्र भगवानगड येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

भगवानगड : श्री क्षेत्र भगवानगड येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त पारंपारिक पद्धतीने गुरुपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. दरवर्षी आषाढी एकादशीनिमीत्त पंढरपूरला गेलेली भगवानगडाची पालखी गडावर पोहोचल्यानंतर गुरुपौर्णिमेच्या दिवशी ''काला'' केला जातो. गडाचे मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरवरून श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीसोबत परतलेले वारकरी तसेच भगवानगडाचा भक्तवर्ग यांच्या उपस्थितीत हा काल्याचा सोहळा साजरा करण्यात आला. योगायोगाने पालखीच्या काल्याच्या दिवशी गुरुपौर्णिमा येत असल्याने हा एक दुग्धशर्करा योग बनतो. सदरील कार्यक्रम साजरा करताना ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या मार्गदर्शनाखाली गडावरील प्रधान आचार्य ह.भ.प.श्री.नारायण महाराज शास्त्री (स्वामीजी) यांनी गडावरील विजयी श्री.पांडुरंगाचा अभिषेक करून वै.गुरुवर्य श्री संत भगवानबाबा, वै.गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराज यांच्या समाधीचा अभिषेक व महापूजा केली. त्यांनतर सर्व भाविकांनी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांना पुष्पहार घालून आपल्या श्रीगुरुंचे यथोचित गुरुपूजन केले. श्रीगुरुंचे पूजन करण्यासाठी ह.भ.प.महंत श्री.विवेकानंद महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.नवनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.हनुमंत महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.अतुल महाराज शास्त्री यांच्यासह गडाचे शेकडो विद्यार्थी व हजारो भाविकांची उपस्थिती होती. उपस्थित हजारो भाविकांना श्रीमती वैजयंता ताई मिसाळ (सचिव प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ संभाजीनगर तथा मुख्याधिपीका प्रतिभाताई पाटील प्राथमिक विद्यालय, छत्रपती संभाजीनगर) यांनी स्वादिष्ट व रुचकर महाप्रसादाची पंगत दिली. दिवसभर श्रीगुरुंच्या दर्शनासाठी भाविकांची रीघ सुरूच होती.

# लोकसभेला गद्दारी करणाऱ्यांच्या विकेट पडणार ?

## पहिली विकेट कोणत्या मतदारसंघाची? चर्चांना उधाण

**नागनाथ वारद । अंबाजोगाई**

बीड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक नुकतीच पार पडली.या निवडणुकीत महायुतीकडून आ.पंकजाताई मुंडे या उमेदवार होत्या. आ. पंकजाताई मुंडे यांचा अल्पशा मतांनी पराभव झाला. पण जे मुंडे यांच्या हक्काचे बालेकिल्ले होते.त्यातच त्यांची घुसमट झाली.केज, गेवराई व बीड मतदार संघाने पंकजाताईला आघाडी दिली नाही. उलट त्या मतदारसंघातून राष्ट्रवादीचे उमेदवार खा. बजरंग सोनवणे यांना आघाडी मिळाली.ज्या मतदारसंघात भाजपाला व विशेषत: पंकजाताईंना आघाडी मिळाली नाही त्या ठिकाणच्या विकेट पडणार असल्याची चर्चा बीड जिल्ह्यात सुरू आहे.पहिली विकेट कुणाची पडणार? हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

. बीड लोकसभा मतदारसंघाकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले होते. महायुतीकडून आ.पंकजाताई मुंडे व महाविकास आघाडी कडून खा. बजरंग सोनवणे यांना उमेदवारी मिळाली. लोकसभा निवडणुकीत वातावरण ' फिरले ' हे सत्य असले तरी बालेकिल्ल्यांनी दगा दिल्याने पंकजाताईंचा पराभव झाला ही सल मुंडे समर्थकांना सतावत आहे. आष्टी मतदार संघाने गेल्या निवडणुकीत माजी खा. प्रितमताई मुंडे यांना ७२ हजारांची आघाडी दिली होती.ती आघाडी मोडीत निघत ३२ हजारावर येऊन ठेपली.त्या ठिकाणी ४०,००० मतांची आघाडी कमी झाली ही भूषणावह किंवा पाठीवर शाबासकीची थाप मारून घेण्यासारखी बाब नाही, चाळीस हजार मतांची आघाडी कमी करण्यात कोणी कोणी हातभार लावला?याचे चिंतन होण्याची गरज आहे.दोन विद्यमान आमदार, एक माजी आमदार सोबत असताना एवढी मोठी घट कशी झाली? याचे उत्तर कोणाकडेही नाही. त्या ठिकाणी राष्ट्रवादीचे विद्यमान आ. बाळासाहेब आजबे आहेत आष्टीची जागा भाजपला सोडून घेण्याची तयारी भाजप नेतृत्वाने सुरू केली असल्याची चर्चा आहे. बीड विधानसभा मतदारसंघाने ६४००० मतांची आघाडी राष्ट्रवादीला दिलेली आहे.त्या ठिकाणी वेगवेगळ्या जाती-धर्माची मते सर्वाधिक असल्याने पक्षाने व नेत्यांनी त्या ठिकाणी भाजपाला आघाडी अपेक्षित धरलेली नव्हती.गेवराई मतदार संघाने यावेळी मोठा धक्का दिला.खा.सोनवणे यांना ३९ हजार मतांची आघाडी दिली. गतवेळी प्रीतम ताईंना ४५००० मतांचे आघाडी गेवराई विधानसभा मतदारसंघाने दिली होती.विद्यमान आ.ॲड.लक्ष्मण पवार, माजी आ.अमरसिंह पंडित हे दिग्गज असताना सुद्धा या ठिकाणी आघाडी मिळू शकलेली नाही. केज विधानसभा मतदारसंघातून लोकसभेला सातत्याने भाजपाला आघाडी मिळालेली आहे. मात्र यावेळी अपेक्षित आघाडी तर मिळाली नाहीत परंतु आहे ती आघाडी कमी होऊन खा. सोनवणे यांना जवळपास १४ हजार मतांची आघाडी मिळाली.या मतदारसंघाने गतवेळी २२५०० मतांची आघाडी प्रीतमताई यांना दिली होती. केज विधानसभा मतदारसंघातून पंकजाताईंच्या विजयाचा फैसला होणार होता. मात्र इथूनच आघाडी कमी झाली आणि पंकजाताईंचा पराभव झाला. या पराभवाला कारणीभूत कोण? असा प्रश्न निर्माण होत आहे.माजलगाव मतदार संघातून पंकजाताईंना आघाडी मिळणार नाही असे गृहीत धरलेले होते मात्र त्या ठिकाणी पंकजाताईंना ९०० मतांची आघाडी मिळाली . माजलगाव बरोबरीत सुटले, परळीने भरभक्कम आघाडी दिली मात्र ताईंचा पराभव कोणी रोखू शकले नाही.आता येत्या काही दिवसात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजणार आहेत.जिल्ह्यात महायुती भाकरी फिरवणार असल्याची चर्चा आहे. कुठल्या-कुठल्या मतदारसंघात बदल होणार हे येणाऱ्या काही दिवसात कळणार आहे. आता पंकजाताईंची वेळ निघून गेलेली आहे. आता त्या- त्या आमदार उमेदवारांची वेळ आहे.या निवडणुकीत ज्यांनी-ज्यांनी पंकजाताईंना दगा दिला त्यांचा हिशोब चुकता केला जाणार असल्याच्या चर्चा सोशल मीडियाद्वारे कार्यकर्ते करीत आहेत. विधानसभेला जिल्ह्यात कोणत्या मतदारसंघाची विकेट पडणार? याकडे बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.जिल्ह्यातील मतदार संघ आदलाबदलीची देखील चर्चा जोर धरत आहे. येणाऱ्या काही दिवसात जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापणार आणि बरेच समीकरणे बदलणार आहेत. जिल्ह्यातील मातब्बर नेते हे खा. शरदचंद्र पवार, उद्धवजी ठाकरे, नानाभाऊ पटोले यांची भेट घेवून येत आहेत काहींनी गुप्त भेटी घेतल्या आहेत.त्यामुळे येणारा काळ गरमा गरमीचा असणार एवढं मात्र खरे!



## कै. गजानन डुबे सामाजिक प्रतीष्ठानचा सेवायज्ञ संपन्न

किल्ले धारुर । प्रतिनिधी

धारूर येथील कै गजानन डूबे सामाजिक प्रतिष्ठान व लायन्स नेत्र रूग्णालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने धारुर येथील नगरेश्वर मंदिर ठिकाणी २१ जुलै रविवार रोजी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरासह गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, विद्यार्थ्यांना पुढील पदवीधर शिक्षण घेण्यासाठी बिना व्याज कर्ज वाटप गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले स्व गजानन डुबे यांचा द्वितीय पुण्यस्मरण सामाजीक उपक्रम राबवून साजरे करण्यात आले.

धारुर येथे कै गजानन डूबे सामाजिक प्रतिष्ठान व लायन्स मित्र रुग्णालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जुलै रविवार रोजी स्व गजानन डुबे याचे द्वितीय पुण्यस्मरण निमीत्त विविध सामाजिक उपक्रम ठेवण्यात आले होते या कार्यक्रमाला अध्यक्ष सराफ सुवर्णकार असोशीयशनचे अध्यक्ष रामचंद्र निर्मळ तर प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यनाथ अर्बन का बैकेचे माजी चेअरमन विकासराव डुबे नेत्रतज्ञ डा एकनाथ शेळके डाक्टर असोशीयशनचै अध्यक्ष डा मयुर सांवत आर्य वैश्य महासभा अध्यक्ष सुमित रुद्रवार कार्याध्यक्ष सुर्यकांत महाजन तालूकाध्यक्ष आनंद भावठाणकर, महीला आघाडी जिल्हाध्यक्ष सुप्रिया चिद्रवार तालूकाध्यक्ष अपर्णा शेटे पत्रकार अतुल शिनगारे अनिल महाजन हे उपस्थीत होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थी सत्कार, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहीत्या वाटप करण्यात आले उच्च शिक्षणा साठी बिन व्याजी कर्जाचे धनादेशाचे वितरण करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष सराफ सुवर्णकार असोशीयशनचे अध्यक्ष रामचंद्र निर्मळ तर प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यनाथ अर्बन का बैकेचे माजी चेअरमन विकासराव डुबे नेत्रतज्ञ डा एकनाथ शेळके डाक्टर असोशीयशनचै अध्यक्ष डा मयुर सांवत आर्य वैश्य महासभा अध्यक्ष सुमित रुद्रवार कार्याध्यक्ष सुर्यकांत महाजन तालूकाध्यक्ष आनंद भावठाणकर, महीला आघाडी जिल्हाध्यक्ष सुप्रिया चिद्रवार तालूकाध्यक्ष अपर्णा शेटे यानी आपले विचार व्यक्त केले

कार्यक्रमाला सुरूवात राष्ट्रगीत गाऊन करण्यात आली सर्वप्रथम कै. गजानन दुबे यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांचे कार्याला उजाळा देणारी चित्रफित त्यांचै आठवणीणी डोळे ओलेचिंब करून गेली यावेळी कार्यक्रमाचे प्रास्तावीक निमेश चिद्रवार यांनी अभार आनंद डुबे यांनी मानले नागरीक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.



**१२० मोफत मोतिबिंदू तपासणी, ४० शस्त्रक्रिया, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य- पदवीधर विद्यार्थ्यांना बिनव्याजी कर्ज वाटप**

## पंडित दिनदयाळ उपाध्याय ऑफलाईन रोजगार मेळाव्याचे बुधवारी आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

पंडित दिनदयाळ उपाध्याय ऑफलाईन रोजगार मेळाव्याचे बुधवार दि. २४ जुलै २०२४ रोजी आयोजन मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नामांकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी, या करिता मुलाखती घेण्यात येणार आहेत.

टाटा क्रोमा प्रा. लिमिटेड बीड येथे, सेल्स पर्सन या पदाची एकुण पदे १६ शैक्षणिक पात्रता बारावी वयोमर्यादा १८ ते ३० जॉब लोकेशन बीड. गोविंदाज प्रा. लिमिटेड नाशिक येथे ट्रेनी या पदाची एकुण पदे-३५० शैक्षणिक पात्रता १२ वी/पदवी वयोमर्यादा १८ ते ३५ जॉब लोकेशन छ.संभाजीनगर/बीड/नाशिक.

सी.आय.ई. ॲल्युमिनीअम कास्टिंग इंडिया मशिनिस्ट, टर्नर, फिटर, ट्रेनी. ट्रेनी इंजिनिअर या पदाची एकुण पदे ८० वयोमर्यादा १८ ते ३५ शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरिंग, आय.टी.आय मशिनिस्ट, आय.टी.आय टर्नर, आय.टी.आय फिटर, नोकरीचे ठिकाण- संभाजी नगर. क्रिएटिव्ह टॅलेंट सोल्युशनस- मशिन ऑपरेटर, सोल्डर मशिन ऑपरेटर या पदाची एकुण पदे-२०० वयोमर्यादा १८ ते ३५ शैक्षणिक पात्रता डिप्लोमा इन मॅकेनिकल इंजिनिअरिंग १० वी/१२ वी आय. टी. आय वयोमर्यादा १८ ते ३५ जॉब लोकेशन- पुणे सदरील पदसंख्या कमी अथवा जास्त असा बदल होऊ शकते. सदर पदांच्या मुलाखती संबंधित कंपनी/आस्थापनेव्दारे त्यांच्या आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष घेतल्या जातील.

पान ६ वरून...

### खोटे शपथपत्र अन् मृत्यूपत्र

दबाव आणण्यासाठी, केस मागे घेण्यासाठी, तडजोड करण्यासाठी, जमीन घोटाळा, नुकसान भरपाई आणि शिक्षेपासून वाचण्यासाठी त्यांचे भाऊ अडथळे निर्माण करत आहेत. जवान गौतम चौधरींचे वय ५५ वर्ष असून ते जम्मू कश्मीर श्रीनगर इथे दोन गोळ्या लागुन ३० वर्ष झाले, गेल्या ०९ वर्षापासून केजमध्ये त्यांचा खटला सुरू आहे. ते मागच्या ०९ वर्षापासू केज येथे श्रीमान जे.डी.चाळक यांच्या माध्यमातून न्यायाची मागणी करत आहेत. जे दहाव्या वर्षीही न्याय मिळत नाही. त्यामुळे गेल्या ०९ वर्षापासू प्रतिवादीची हिंमत वाढत असल्याचे जवान गौतम चौधरी यांनी म्हटले आहे.

### ॲड शेख शफीक भाऊ यांनी

दाखवून दिला. वास्तविक पाहता गजापूर येथील हल्ल्याचा निषेध करण्याकरिता शफिक भाऊंनी बीड शहरातील जनतेला निषेध व्यक्त करण्यासाठी एकत्रित येण्याचे आवाहन केले होते परंतु मशिदीवरील हा हल्ला एवढा अमानवीय आणि दुसऱ्या धर्माचे मर्दन करणार होता की, याची जेवढी निंदा नालस्ती करावी तेवढी कमीच होती. यामुळे सर्व समाजामध्ये प्रचंड प्रमाणात रोष निर्माण झालेला आहे आणि तोच रोष व्यक्त करण्याकरिता फक्त बीड शहरातीलच नाही तर संपूर्ण बीड जिल्ह्यातील जनता बशीरगंज चौकात एकवटली होती. यामुळे आपल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन लांबलांबून हजारोंच्या संख्येने येऊन सहभागी झाल्याबद्दल एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी मनस्वी आभार व्यक्त केले आहे.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन भुमीत श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे प्रतिवर्षी प्रमाणेच यावर्षीही आज दि.२१ रविवार रोजी गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळी बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते भगवान बेलेश्वराच्या मुर्तीला अभिषेक, श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराजांच्या समाधीची महापुजा करण्यात आली. वारकरी मंडळींच्या वतीने भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर महापंगतीच्या प्रसादाचा भाविकांनी आस्वाद घेतला. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी गुरूपौर्णिमा निमित्त श्रीगुरू ईश्वरबाबा भारती समाधीचे दर्शन घेण्यासाठी व बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज व शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचे आशिर्वाद घेण्यासाठी मंदिरात गर्दी केली होती.

गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व ; गुरूप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस :- शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज

गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व असुन आषाढ महिन्याच्या पोर्णिमेच्या दिवशी गुरूपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो.या दिवशी अध्यात्मिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रांतील गुरूप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते.आषाढ महिन्यातील पोर्णिमा गुरूपौर्णिमा म्हणून ओळखली जाते.महर्षी वेदव्यास यांनी मानवजातीला चार वेदांच ज्ञान दिले.त्यामुळे महर्षी वेदव्यास यांना प्रथम गुरू मानलं गेलं.महर्षी वेदव्यास यांचा जन्म पोर्णिमेच्या दिवशी झाला होता.म्हणुन या पोर्णिमेला गुरूपौर्णिमा म्हणतात.





## अध्यात्माची महानता समजून घेतल्यास सुसंस्कारित पिढी निर्माण होईल

**माजलगाव । प्रतिनिधी**

अध्यात्मिक क्षेत्राची महानता जाणून समाजाने त्या दिशेने मार्गक्रमण करण्याची गरज निर्माण झाली आहे. गुरूपौर्णिमेचे महत्व आम्हाला पूर्वजांनी सांगितले आहे. त्यामुळे पूर्वजांनी दिलेल्या संस्कारक्षम विचाराने वागल्यास सुसंस्कारित पिढी निर्माण होईल,असे प्रतिपादन श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी रविवारी केले. दरम्यान, सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठातर्फे १११ गुणवंतांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आली तर ९० गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.अशाप्रकारे माजलगाव मठात गुरूपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

शिक्षणामुळे माणसाच्या जीवनात अमुलाग्र बदल होतो. शिक्षणातच आयुष्याच्या प्रगतीची बीजे रोवलेली आहेत. त्यामुळे शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा सदुपयोग करावा, असे स्पष्ट मत सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी आज गुरूपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात मांडले. गुरूपौर्णिमेनिमित्त माजलगाव येथील श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठात विविध कार्यक्रम घेण्यात आले. यात प्रामुख्याने इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली.या गुरूपौर्णिमा सोहळ्यास समाज बांधवांना मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी आशीर्वचनपर भाषणातून मार्गदर्शन केले.पुढे बोलताना श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले, माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठातर्फे दरवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील गरजू व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. लिंगैक्य तपोरत्नं प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी समाजाच्या हितासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली.तो वसा आणि वारसा आम्ही समर्थपणे पुढे चालवू शिक्षण हे जीवनात अमुलाग्र बदल घडविणारे माध्यम आहे. त्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करून जीवनाचे सोने करावे,असे भावनिक आवाहनही श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले. मिळालेल्या शिष्यवृत्तीचा अतिशय गांभीर्याने विचार करून शिष्यवृत्तीतील रक्कमेचा सदुपयोग करावा,असे समाजबांधवांना कळकळीचे आवाहनही महाराजांनी केले. गुरूपौर्णिमेनिमित्त माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठात विविध धार्मिक विधी पार पडल्या. समाजबांधवांकडून सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संजीवन समाधीस रूद्राभिषेक, लिंगैक्य तपोरत्नं प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या समाधीस अभिषेक, श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची पाद्यपूजा करण्यात आली.

**पुढील वर्षी शिष्यवृत्तीचे स्वरूप बदलणार'**

शिष्यवृत्तीबाबत माहिती देताना श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले,पुढील वर्षापासून शिष्यवृत्ती स्वरूप बदलण्यात येणार आहे.बारावी नंतरच्या विद्यार्थ्यांना मेडिकल आणि इंजिनिअरिंगचा कोर्स पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती स्वरूपात मदत केली जाणार आहे.जीवनात मोठे झाल्यानंतर मठाने दिलेल्या शिष्यवृत्तीरूपी शिदोरीचा समाजाच्या भल्यासाठी उपयोग व्हावा,असेही आवाहन श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले.



**श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आशिर्वचन**

**माजलगाव मठात गुरूपौर्णिमा उत्सव साजरा; १११ गुणवंतांना शिष्यवृत्तीचे वितरण**



### जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, यांचे कार्यालय

शासकीय इमारत चांद मारी वसाहत,धानोरा रोड बीड ४३११२२

दूरध्वनी क्र.०२४४२-२२२५८६ ई-मेल .

क्रमांक /आस्था-२ एस.आर .१९१/२०२३१. बीड दिनांक-०३/०७/२०२४

**जाहीर सूचना**

प्रति,

१. भागवत भास्कर जाधव वरील रा.शेलगाव गांजी ता. केज जिल्हा. बीड २. सतीश भास्कर जाधव,

विरुद्ध. अपीलदार

१. काशिनाथ मुकुंद सोळंके, २. शिवाजी प्रश्न जाधव ३.राजेभाऊ साहेबराव जाधव, ४.लिंबाजी साहेबराव जाधव,५. अंगद बाबासाहेब जाधव, ६.मंदाकिनी भ्र लिंबाजी जाधव,

वरील १ ते ६ रा. शेलगाव गांजी ता. केज जि. बीड

७. नामदेव पांडुरंग डिकले, रा.सोनेसांगवी ता. केज जि. बीड ८.मोहन तात्याबा पौळ, राहणार मोटेगाव ता. केज जि. बीड ९. मुकुंद श्रीहरी जाधव,१० किसन योगीराज जाधव, ११.बाबासाहेब मुकुंद जाधव,१२. योगीराज सिताराम जाधव,१३. प्रभाकर महादेव जाधव, १४. गोवर्धन आत्माराम पटणे,१५.गणेश बलसिंग पटणे, १६. तेजस शिवलिंग पटणे,१७.अमोल रासलिंग पटणे, वरील ९ते १७ रा. शेलगाव गांजी ता. केज जि. बीड. : जबाबदार

या जाहीर सूचनेद्वारे करण्यात येते की अर्जदार यांनी गैर अर्जदार यांच्याविरुद्ध जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे शेलगाव गांधी तालुका केज जिल्हा बीड येथील सर्वे नंबर १६ ची फाळणी बारापोटहिस्सा मोजणी दुरुस्ती करणे बाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेला आहे.

वरील गैर अर्जदार यांनी जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की वरील प्रकरणी दिनांक १४/०८/२०२४ रोजी वेळ सकाळी ११:३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बीड यांचे कार्यालय चांदमारी शासकीय वसाहत, पालवन चौकाजवळ,धानोरा रोड बीड ता. जि. बीड यांच्या समोर सुनावणी आहे. वरील नमूद गैरअर्जदार यांनी नमूद तारखेस न्याय काक्षेत सुनावणीस उपस्थित राहावे.

वरील नमूद गैरअर्जदार, वरील नमूद तारखेस गैरहजर राहिल्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत
कृष्णा शिंदे
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड


cmyk

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
सोमवार दि.२२ जुलै २०२४
४

# देशाच्या राजधानीत टोमॅटोचे शतक

## मुसळधार पावसाचा दरावर परिणाम, आणखी दर वाढण्याची शक्यता

मुंबई : टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. टोमॅटोच्या दरात मोठी वाढ झाली आहे. याचा फायदा ज्या शेतकऱ्यांकडे आता टोमॅट आहेत, त्यांना होणार आहे. टोमॅटो उत्पादक राज्यांमध्ये अतिवृष्टीमुळे त्याचा पुरवठा विस्कळीत होत आहे. त्यामुळे किरकोळ विक्रीच्या किमती झपाट्याने वाढत आहेत. देशाची राजधानी दिल्लीत टोमॅटोचे दर हे १०० रुपये किलोच्या पुढे गेले आहेत. येत्या काही दिवसात टोमॅटोचे भाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

देशाच्या अनेक भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळ टोमॅटो पुरवठ्याची साखळी विस्कळीत झाली आहे. तसेच अनेक भागात पावसामुळं पिकांचं देखील नुकसान झालं आहे. दरम्यान, वाढत्या दरात शेतकऱ्यांना फायदा होत आहे. मात्र, ग्राहकांना फटका बसत आहे. दिल्लीत टोमॅटोच्या किरकोळ किंमती १०० रुपये किलोच्या पुढे गेल्याचे सांगण्यात येत आहे. अशातच प्रतिकूल हवामानामुळे बाजारात टोमॅटोची विक्री झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीच्या किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर १०० रुपये किलोवर पोहोचले. तर असंघटित किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर



१०० ते १२० रुपये किलोपर्यंत पोहोचले होते. मात्र, सरकारी आकडेवारीनुसार टोमॅटोचे दर अद्याप १०० रुपयांपर्यंत पोहोचलेले नाहीत.

ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २० जुलै रोजी दिल्लीत टोमॅटोच्या दैनिक सरासरी किरकोळ किमती ९३ रुपये प्रति किलो होत्या. सरकारी आकडेवारीनुसार, २० जुलै रोजी टोमॅटोची राष्ट्रीय सरासरी किंमत ७३.७६ रुपये प्रति किलो होती. दरवर्षी या महिन्यांत टोमॅटोच्या दरात वाढ होत असते. गतवर्षी परिस्थिती खूपच बिकट झाली होती, किरकोळ बाजारात टोमॅटोचा भाव ३५० रुपये किलोवर पोहोचला होता. त्यानंतर सरकारने सहकारी संस्थांच्या मदतीने अनेक शहरांमध्ये सवलतीच्या दरात टोमॅटोची विक्री सुरू केली. दिल्ली-एनसीआरच्या ग्राहकांना मदर डेअरीच्या सफाल स्टोअरमध्ये सवलतीच्या दरात टोमॅटो मिळत होते.

प्रतिकूल हवामानामुळे टोमॅटोच्या दरात वाढ?

टोमॅटोचे भाव वाढण्यास प्रतिकूल हवामान जबाबदार धरले जात आहे. उष्णतेच्या लाटेनंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे टोमॅटोचे भाव वाढत आहेत. मुसळधार पावसामुळे हिमाचल प्रदेशातून किरकोळ बाजारात टोमॅटोचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे टोमॅटोचे भाव झपाट्याने वाढत आहेत. प्रतिकूल हवामानामुळे टोमॅटो व्यतिरिक्त दिल्लीत बटाटे आणि कांद्याच्या किमतीही वाढत आहेत.

बटाटा आणि कांद्याच्या दरातही तेजी

दिल्लीच्या किरकोळ बाजारात कांदा आणि बटाट्याच्या सध्याच्या किंमतीत देखील वाढ झाली आहे. दिल्लीत कांद्याचे दर हे ४६.९० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचले होते. बटाटा ४१.९० रुपये किलो दराने विकला जात आहे.

# ऊस गवताळ वाढ नियंत्रण कशी करावी?

गवताळ वाढ हा फायटोप्लाझ्मा या अति सूक्ष्म जिवाणूंमुळे होणारा रोग आहे. या रोगाचे जास्त प्रमाण हे मुख्यतः लागणीपेक्षा खोडवा पिकावर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. महाराष्ट्रातील प्रचलित जातींमध्ये को ४१९, को ७४०, को ७५२७ आणि को.सी. ६७१ या जाती या रोगास कमी ते मध्यम प्रमाणात बळी पडलेल्या दिसून येतात. परंतु हा गवताळ वाढ रोग अलीकडील प्रसारित जातींच्या खोडव्यामध्येही काही अंशी दिसू लागला आहे. गवताळ वाढ हा रोग उसामधील वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेमध्ये महत्त्वाची लक्षणे दर्शवितो.



रोगग्रस्त उसाची प्राथमिक लक्षणे लावणीनंतर अथवा खोडव्यातील उगवून आलेल्या उसाच्या पानावर दिसून येतात. फायटोप्लाझ्मामुळे लागण झालेल्या उसाच्या पानांमध्ये हरितद्रव्ये नसल्यामुळे पाने पांढरी अथवा पिवळसर पडलेली दिसून येतात, याला अल्बिनो रोग म्हणतात. अशा उसाच्या बेटांमधून असंख्य फुटवे घेऊन अशी बेटे खुरटी राहतात. हे फुटवे निव्वळ पांढरट अथवा पिवळसर दिसून त्याची पाने अरुंद, लहान, टोकाकडे निमुळती होत गेलेली दिसून येतात व त्यास गवताच्या ठोंबाचे स्वरूप येते. काही वेळेस नुसतेच रंगाचे असंख्य फुटवे असलेले दिसून येतात. अशा गवताळ बेटांमध्ये नव्याने येणारे फुटवे फार दिवस टिकत नाहीत, गाळपालायक ऊस तयार होत नाहीत. प्रादुर्भावग्रस्त उसाच्या बेटामधील पाने ही टोकाकडून जळत जाऊन उसाचे बेट पूर्णतः मरून जाते. प्रादुर्भावग्रस्त बेटांमध्ये क्वचित ठिकाणी करंगळीएवढे अथवा त्यापेक्षा लहान ऊस तयार होतात. अशा उसावरील कांड्या आकाराने खूपच बारीक तयार होऊन कांड्यांवरील डोळे वेळेअगोदर फुटून त्यामधून पिवळी पाने बाहेर येतात आणि जमिनीलगतच्या कांड्यांवर मुळ्या आलेल्या दिसून येतात.

आर्थिक नुकसान : प्रादुर्भावग्रस्त ऊस बेटा मध्ये गाळप लायक ऊस तयार होत नसल्यामुळे ऊस उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट येते. या रोगामध्ये नवीन तयार होणारे फुटवे मरून गेलेले दिसतात. काही ठिकाणी एखादा दुसरा ऊस असल्यास त्याच्या कांड्या करंगळीएवढ्या वा त्याहून बारीक दिसतात. या उसाची जाडी व उंची कमी असते.

गवताळ वाढ रोगावर उपाययोजना : रोगमुक्त बेणे मळ्यातील ऊस लागवडीसाठी वापरावा, दर तीन वर्षांतून बेणे बदलून प्रमाणित बेणे वापरावे. लागवडीनंतर किंवा खोडव्यामध्ये गवताळ वाढीची बेटे आढळून आल्यास ती मुळासकट काढून जाळून नष्ट करावीत. लागवडीपूर्वी बियाण्यास उष्ण जल अथवा उष्ण बाष्पाची प्रक्रिया करावी किंवा अशी प्रक्रिया केलेल्या बेणेमळ्यातील बेणे लागवडीसाठी वापरावे. ऊस पिकावर आढळणाऱ्या रसशोषण करणाऱ्या मावा किडी मार्फत या रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार होऊ शकतो, त्यामुळे वेळोवेळी नियमितपणे पिकांचे सर्वेक्षण करून आढळून येणाऱ्या किडीवर आंतरप्रवाही कीटकनाशकांची (दीड मि.लि. डायमिथोएट प्रति लिटर) फवारणी करावी.

रोगप्रतिकारक अथवा रोगास कमी बळी पडणाऱ्या जाती को ८६०३२ आणि फुले ०२६५ या जातींची लागवड करावी. लागवडीखालील उसामध्ये गवताळ वाढ जास्त प्रमाणात असल्यास अशा उसाचा खोडवा घेऊ नये अथवा त्यामधील ऊस बियाणे म्हणून वापरू नये. अशी बेटे उपटून त्याठिकाणी निरोगी ऊस बेण्याची लागण करावी.

# कृषी महाविद्यालय पुणे येथील कृषिकन्येने शोधला 'हूमणी कीड' नियंत्रणासाठी जैविक उपाय!

पिकासाठी सर्वात हानिकारक किडीपैकी एक म्हणजे हूमणी कीड. या किडीचा प्रादुर्भाव जवळपास सर्वच पिकांवर आढळून येतो. तसेच वेगवेगळ्या अवस्थेत ही कीड आढळून येत असल्यामुळे जवळपास वर्षभर या किडीमुळे होणारे नुकसान सहन करावे लागते. हूमणी किडीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक पद्धती जास्त फायदेशीर ठरते, आणि यामध्ये जैविक पद्धतीचा महत्त्वाचा वाटा असतो.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय पुणे येथील चतुर्थ वर्षाची विद्यार्थिनी सृष्टी संदीप शितोळे आणि तिच्या सहकारी विद्यार्थ्यांनी हूमणी कीड जैविक नियंत्रणासाठी मेटाऱ्हाझियमची निर्मिती केली आहे. या मेटाऱ्हाझियमचा वापर प्रामुख्याने हूमणी अळी, पिठ्या ढेकूण, पांढरी माशी, मावा, फुलकिडे, तुडतुडे इत्यादी किडींच्या नियंत्रणासाठी केला जातो. ऊस, भात, भुईमुग, मका, बाजरी इत्यादी खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करणाऱ्या हूमणी अळीच्य नियंत्रणासाठी तसेच फळबागांमध्ये व पाळेभाज्यांसाठीही या मेटाऱ्हाझियमचा वापर करता येतो. हूमणी अळीच्या नियंत्रणासाठी वापरले जाणारे मेटाऱ्हाझियमची हे बुरशीयुक्त जैविक कीटकनाशक आहे. ते हूमणी अळीच्या शरीरात प्रवेश करून उपजीविका करते. त्याच्या संपर्कात आलेली अळी साधारणतः १०-१५ दिवसांत मरते. सृष्टीसह सायली भोये, आदित्य संतोष ताकवणे, संकेत कदम, पद्माकर जठार आदी विद्यार्थ्यांनी मदत केली. हे मेटाऱ्हाझियम आतापर्यंत नारायणगाव केव्हीके, भुईज कारखाना, सातारा, दौंड, शिरूर, आळंदी अशा विविध ठिकाणी



पाठविले आहे.

मेटाऱ्हाझियम बुरशी वापरताना काय दक्षता घ्यावी?: फवारणीपूर्वी व नंतर १ आठवडा रासायनिक बुरशीनाशक टाळावे. कोरड्या हवामानात पिकास भरपूर पाणी द्यावे. तसेच फवारणीनंतर चांगल्या नियंत्रणासाठी दोन दिवस तिसर्या प्रहरी पाणी द्यावे. मेटाऱ्हाझियमची बॅग थंड जागेत साठवावी. बोर्डो मिश्रण, कॉपर ऑक्सिक्लोराइड व इतर रासायनिक बुरशीनाशके वापरू नयेत. वापरण्याची पद्धत : प्रति एकरी ऊस पिकासाठी ८ किलो 'फुले मेटाऱ्हाझियम' शेण खतात मिसळून पिकास द्यावे. प्रति लिटर पाण्यात ५ ग्रॅम 'फुले मेटाऱ्हाझियम मिसळून शेत वापश्यावर असताना उसाच्या खोडात आळवणी करावी. १००० ग्रॅम 'फुले मेटाऱ्हाझियम' २०० लिटर पाण्यात मिसळून साध्या किंवा एच. पी. टी. पंपाने फवारावे. मेटाऱ्हाझियमचे फायदे : निर्यातक्षम फळे व भाजीपाला यावर विषारी कीटकनाशके यांचे अवशेष व दुष्परिणाम टाळण्यासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी उपयुक्त.

# अति घन पद्धतीने आंबा लागवड

अती घन लागवड म्हणजे एकरी जास्तीत जास्त झाडे बसवणे होय. या पद्धतीमध्ये सूर्यप्रकाश, कार्बन डायऑक्साइड, जमीन व अन्य संसाधने, तंत्रज्ञानाचा काटेकोर वापर करून एकरी जास्तीत जास्त उत्पादन व नफा मिळवणे शक्य आहे. सर्वसाधारण शिफारशीत १० बाय १० मीटर अंतराऐवजी लागवडीचे अंतर अर्धे म्हणजे ५ बाय ५ मीटर केल्यास दुप्पट झाडे बसतात. त्याला घन लागवड म्हणतात. त्याहीपुढे जाऊन १.५ बाय ३ मीटर किंवा १.५ बाय ४ मीटर असे अंतर ठेवल्यास एकरी झाडांची संख्या आठ ते दहा पट जास्त होते. त्यास अतिघन लागवड असे म्हणतात. फक्त ही लागवड चौरस पद्धतीने करण्याऐवजी आयताकृती (एकीकडून अंतर कमी करावे, तर दुसरी बाजू सर्वसाधारण ठेवावी.) व दक्षिण उत्तर पद्धतीने करावी. त्यामुळे दिवसभर झाडांना सूर्यप्रकाश याचा लाभ मिळू शकतो.



अतिघन आंबा लागवड पद्धतीमुळे होणारे फायदे : १) सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेता येतो. २) कार्बनडाय ऑक्साईड (२) हा हवेपेक्षा जड असल्यामुळे झाडांकडून खालच्या थरात जास्त शोषण होते. ३) बाग लवकर फळात येते. ४) एक अंतर सर्वसाधारण ठेवल्यामुळे आंतरमशागत, फवारणी, खते देणे, फळांची अंतर्गत वाहतूक इ. कामे ट्रॅक्टरने करणे सोईस्कर. ५) जमीन आणि संसाधने यांचा उत्तम वापर. ६) फळांची निर्यातयोग्य गुणवत्ता मिळण्यासाठी उपाययोजना उदा. विरळणी, काढणी इ. सहज करता येतात. ७) उत्तम प्रतीची फळे आणि जास्त उत्पादन शक्य. ८) आधुनिक तंत्रज्ञानाचा सहज वापर करता येतो.

अति घन लागवडीचे तोटे : १) फळबाग उभारणीस सुरुवातीला जास्त खर्च लागतो. २) बागेचे आयुष्यमान तुलनेने कमी. ३) झाडाचे घेर नियंत्रण थोडे खर्चिक होते.

आवश्यक जमीन : १) आंब्याची अतिघन पद्धतीने लागवड करण्यासाठी जमीन ही उत्तम निचऱ्याची, एक मीटर खोल असावी. यासाठी काळी जमीन लागते. २) जमिनीचा सामू ६.५ ते ८ असावा लागतो.

अतिघन लागवड पद्धत : १) आंबा लागवडीसाठी साधारणतः १ बाय १ बाय १ मीटरचा खड्डा खोदून भरून घ्यावा लागतो. २) अतिघन लागवडीत दोन झाडातील अंतर अतिशय कमी असल्याने खोदकाम यंत्राद्वारे एक मीटर रुंद व एक मीटर खोल नाली खोदून घेता येते. ३) जमीन हलकी असेल, तर ६० टक्के गाळ आणि ४० टक्के नालीतील मुरमाड माती अशा मिश्रणाने भरून घ्यावी. ४) नाली भरताना जेथे कलम लावायचे आहे, त्या ठिकाणी दोन टोपले शेणखत एक किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि शिफारशीत कीडनाशक पावडर मिसळून भरून घ्यावा. ५) चांगला पाऊस पडून किंवा पाणी देऊन भरलेली मोकळी माती दाबल्यानंतर कलमांची किंवा इनसिटू पद्धतीने लागवड करावी.

६) लागवडीच्या ठिकाणी कलमाची पिशवी बसेल असा लहानसा खड्डा खणावा. ७) त्यामध्ये ५०० ग्रॅम निंबोळी पेंड, २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा, २५ ग्रॅम अझोटोबॅक्टर व २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणूसंवर्धक मिसळून कलम लागवड करावी.

आच्छादन वापर : १) अतिघन लागवड केलेल्या बागेत दरवर्षी कलमा खालील संपूर्ण सावलीत उसाचे पाचट, वाळलेले गवत, साळीचे तणसाचे आच्छादन करावे. २) आच्छादन करताना त्यात शिफारशीत कीडनाशक पावडर धुरळावी. ३) त्यामुळे वाळवीचा त्रास होणार नाही. ४) सेंद्रिय पदार्थ उपलब्ध नसल्यास प्लॅस्टिकचे आच्छादन करावे.वारा प्रतिबंधक झाडांची लागवड : १) कलमांना हिवाळ्याच्या शेवटी फळधारणा सुरू होते. २) फळांची संपूर्ण वाढ ही भर उन्हाळ्यात होते. ३) या काळात ऊन तसेच गरम हवेपासून बाग व फळांचे संरक्षण करण्यासाठी बागेभोवती सुरू, महागनी या उंच वाढणाऱ्या वारा प्रतिबंधक वृक्षाची लागवड करावी.

फळांसाठी छाटणी : १) फळधारणा सुरू झाल्यानंतर दरवर्षी बागेत शास्त्रीय पद्धतीने छाटणी करावी. २) दरवर्षी फळ काढणी होताच झाडाची छाटणी करावी. ३) छाटणीवेळी शक्यतोवर मागील वर्षाची अर्धी किंवा पूर्ण फूट छाटून घ्यावी.

४) छाटलेल्या ठिकाणी झाडावर बोर्डो पेस्ट लावावी. नवी पालवी येत असताना पावसाळा सुरू होतो. ५) त्यामुळे पानावर करपा रोग किंवा पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. ६) प्रादुर्भाव ओळखून नियंत्रण करावे.

कलमांना वळण : १) लागवडीनंतर कलमांना शिफारशीप्रमाणे खत, पाणी द्यावे. २) प्रादुर्भाव लक्षात घेऊन कीड, रोग नियंत्रण करावे. ३) कलम दीड ते दोन फिट उंचीचे होईपर्यंत एकच खोड राहू द्यावे. नंतर शेंडा मारावा. ४) त्या ठिकाणाहून ३ ते ४ फांद्या निघतील. ५) त्यातील चांगल्या व भरघोस तीन फांद्या ठेवाव्यात. परत त्या फांद्यांना दोन ते तीन पेरांनंतर शेंडा मारावा. ६) अशा प्रकारे कलमांचा सांगाडा तयार करून घ्यावा. ७) सांगाडा तयार झाल्यानंतर तिसऱ्या वर्षाच्या सुरुवातीला कलमांची चांगली वाढ होऊन त्यावर भरपूर मोहोर येतो. अतिघन लागवड पद्धतीची वैशिष्ट्ये : १) फळधारणा सुरुवात ३ वर्षात होते. २) पूर्ण उत्पादकता ५ वर्षात. ३) छाटणी अत्यंत सोपी. ४) फवारणी फार सोपे ५) बागेचे आयुष्य २० ते २५ वर्ष

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९०८ : 'देशाचे दुर्दैव' हा जहाल अग्रलेख लिहिल्याबद्दल लोकमान्य टिळकांना ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा
१९३१ : फ़र्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वासुदेव बळवंत गोगटे यांनी सर जॉन हॉटसन या मुंबई प्रांताच्या राज्यपालावर गोळया झाडल्या. हॉटसन वाचला. पुढे हे 'हॉटसन' गोगटे पुण्याचे महापौर बनले.
१९३३ : विली पोस्ट या वैमानिकाने एकटयाने ७ दिवस १८ तास व ४९ मिनिटे या विक्रमी वेळात विमानातून पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण केली.
१९४२ : वॉर्सा मधुन ज्यूंना हद्दपार करणे सुरू झाले.
१९४४ : पोलंडमधे कम्युनिस्ट राजवटीची सुरुवात झाली.
१९४६ : इर्गुनया दहशतवादी संघटनेने जेरुसलेम मधील ब्रिटिश मुख्यालयावर बॉम्ब हल्ला केला. त्यात ९० ठार.
१९४७ : राष्ट्रीय ध्वजाचा स्वीकार.
१९७७ : चीनचे नेते डेंग क्सियाओ पिंग पुन्हा सत्तेवर आले.
१९९३ : वेषभूषाकार भानू अथैय्या यांना अमेरिकेतील अ‍ॅकेडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट अँड सायन्स या संघटनेचे सदस्यत्त्व देण्यात आले. या सदस्यांना प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराबाबत मत देण्याचा अधिकार आहे.
१९९९ : आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने समान कामांसाठी समान वेतन ही योजना लागू केली.
२००१ : जागतिक जलतरण स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा मातब्बर जलतरणपटू इयान थॉर्प याने आपला पहिला विश्वविक्रम केला. त्याने ४०० मीटर फ्रीस्टाईल शर्यत ३ मिनिटे ४०.१७ सेकंद अशा विक्रमी वेळात जिंकली.
२००३ : अमेरिकेच्या लष्करी सैन्याने इराकवर केलेल्या बॉम्ब हल्ल्यात इराक शासक सद्दाम हुसेन यांची मुले मारली गेली.
२०१२ : भारताच्या राष्ट्रपती पदावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकरणी, प्रणव मुखर्जी यांची नियुक्ती करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८७ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ गुस्तावलुडविग हर्ट्झ यांचा जन्म.
१८९४ : भारतातील पहिल्या लोकसभेचे सदस्य सरदार तेज सिंह अकरपुरी यांचा जन्मदिन.
१८९८ : पं. विनायकराव पटवर्धन भारतीय शास्त्रीय संगीताच्या ग्वाल्हेर घराण्यातील गायक (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७५)
१९१५ : भारतीय-पाकिस्तानी राजकारणी आणि राजनयिक शैस्ता सुहरावर्दी इकामुल्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २०००)
१९२३ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (मृत्यू: २७ ऑगस्ट १९७६)
१९२५ : गोविंद तळवलकर पत्रकार (२७ वर्षे महाराष्ट्र टाइम्सचे संपादक) व लेखक. भारत सरकारचा लोकमान्य टिळक पुरस्कर सन्मानित महाराष्ट्रीयन प्रतिष्ठित पत्रकार, इंग्रजी वृत्तपत्र महाराष्ट्र टाईम्सचे दिग्गज संपादक, इतिहासकार, अभ्यासक, समाजसुधारक व लेखक
१९३७ : वसंत बाबुराव रांजणे मध्यमगती गोलंदाज (मृत्यू: २२ डिसेंबर २०११)
१९६५ : रॅमन मॅगसेसे पुरस्कार सन्मानित भारतीय सामाजिक कार्यकर्ते व आशा संस्थेचे एक संस्थापक व सदस्य संदीप पांडे यांचा जन्मदिन.
१९७० : महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्म.
१९९२ : अमेरिकन गायक व अभिनेत्री सेलेना गोमेझ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४० : हंगेरीचा राजा जॉन झापोल्या यांचे निधन.
१८२६ : इटालियन खगोलशास्त्रज्ञ ज्युसेप्पे पियाझी यांचे निधन.
१९१८ : इन्दर लाल रॉय पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (जन्म: २ डिसेंबर १८९८)
१९४८ : स्वातंत्र्य पूर्व भारतातील प्रसिद्ध भारतीय चित्रकार हेमेंद्रनाथ मजूमदार यांचे निधन.
१९८४ : गजानन लक्ष्मण तथा ग. ल. ठोकळ उत्कृष्ट मराठी कथा लेखक, साहित्यिक व प्रकाशक (जन्म: १९०९)
१९८७ : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू ए. जी. क्रिपाल सिंह यांचे निधन.
१९९५ : हेरॉल्ड लारवूड इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १४ नोव्हेंबर १९०४)
२००३ : कुसय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १७ मे १९६६)
२००३ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १८ जून १९६५)

# फवारणी केल्यानंतरही तण जिवंतच, शेतकरी अडचणीत

पुणे : तणनाशकांना बाजारपेठेत असलेली मागणी पाहत अनेक कंपन्या रिंगणात उतरल्या आहेत. मात्र, यंदा अनेक शेतकऱ्यांनी फवारणी केल्यानंतरही तण तसेच उभे आहे. शिवाय फवारणी क्षेत्रातील पिकांची वाढही होत नसल्याच्या तक्रारी येत आहेत.

तणनाशकांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारींचा सूर गावोगावी उमटू लागला आहे. कृषी विभागाकडेही याबाबत लेखी तक्रारी शेतकरी देत आहेत. तर कंपन्यांचे विक्री प्रतिनिधी शेतकऱ्यांच्या भेटीगाठी घेऊन ही प्रकरणे जागेवर मिटवण्याचा प्रयत्नसुद्धा करीत आहेत. निंदणाचा खर्च वाचण्यासाठी तसेच पीक तणमुक्त करण्यासाठी मागील काही वर्षात तणनाशकांचा वापर वाढला. किटकनाशकांप्रमाणेच तणनाशकांचीही एक मोठी बाजारपेठ तयार झाली आहे. हंगामाच्या तोंडावर विविध कंपन्यांकडून तणनाशकांच्या जाहिरातींचा भडीमार शेतकऱ्यांवर केला जातो. यामुळे कुठले तणनाशक वापरावे याचा संभ्रमही अनेकदा तयार होत असतो. या वर्षी अनियमित पावसाने पेरण्याही भिन्न कालावधीत झालेल्या आहेत. यामुळे पिकांची अवस्था वेगवेगळी आहे. गेल्या काही दिवसात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सातत्याने होत असल्याने पिकांमध्ये तणांचे प्रमाण वाढले. त्यामुळे तणनियंत्रणासाठी शेतकरी तणनाशकांची फवारणी करत आहेत. बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात तणनाशके उपलब्ध असून विक्रेत्यांच्या सल्ल्याने शेतकरी त्याची खरेदी करून फवारत आहेत. या हंगामात तणनाशकांचा प्रभाव होत नसल्याच्या तक्रारी शेतकरी करीत आहेत.

# आरटीई अंतर्गत इंग्रजी शाळेतील मोफत प्रवेशासाठी २ हजार २६ विद्यार्थ्यांची निवड

## जिल्ह्यात २ हजार २६ विद्यार्थ्यांना मिळणार इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश-मनोज जाधव

बीड (प्रतिनिधी) आरटीई प्रवेश प्रक्रियेत शासनानं आरटीईच्या नियमात काही बदल करत त्याबाबतचा नियमबाह्य अध्यादेश फेब्रुवारीत काढण्यात आला होता. मात्र हा अध्यादेश मुंबई हायकोर्टाकडून रद्द करत इंग्रजी शाळा आणि सरकारला आरटीई प्रवेश द्यावेच लागतील असा आदेश दिल्या नंतर लागलीच रज्याच्या शालेय शिक्षण विभागाने काल दि. २० जुलै रोजी निवड याद्या प्रसिद्ध केल्या. यात राज्यात एकूण ९३ हजार ९ विद्यार्थ्यांची निवड झाली असून जिल्ह्यामध्ये २ हजार २६ विद्यार्थ्यांची निवड मोफत प्रवेशासाठी झाली आहे. आता या विद्यार्थ्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार आरटीई प्रवेश देणे बंधनकारक आहे अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते



मनोज जाधव यांनी दिली आहे.

रखडलेल्या आरटीई प्रवेश प्रक्रियेमुळे अर्ज दाखल केलेले सर्वसामान्य, गोरगरीब पालक चिंतेत होते आपल्या पाल्यांचा प्रवेश कुठे घ्यायचा असा यक्ष प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. मात्र न्यायालयाने या पालकांना दिलासा देत प्रवेश प्रक्रिया सुरू केले असून यात जिल्ह्यातील २ हजार २६ विद्यार्थ्यांना आता मोफत प्रवेश मिळणार आहे. याकरिता ज्या विद्यार्थ्यांची निवड मोफत प्रवेशासाठी झाली आहे. त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या वतीने एसएमएस पाठवण्यात येतील

**पालकांना सूचना :** आरटीई २५ टक्क्याचे ऑनलाईन प्रवेश अर्जाची स्थिती पाहत असताना सर्व्हरच्या क्षमतेपलीकडे जाऊन पोर्टल स्लो होऊ शकते त्यामुळे पालकांनी संभ्रमात न पडता काही वेळाने पुन्हा प्रयत्न करावा. निवड यादीतील प्रवेश पात्र बालकाच्या पालकांनी अर्ज भरताना जी कागदपत्रे नोंदविली आहेत त्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रति व साक्षांकित प्रति घेऊन तालुका निवड समिती कडे जावे तसेच आपल्याला मिळालेल्या अलॉटमेंट लेटरची प्रिंट त्यांच्या लॉगिन मधून किंवा पडताळणी समितीकडे जाऊन काढावी काढून घ्यावी. पालकांनी आपल्या बरोबर आरटीई पोर्टलवर असलेली हमी पत्राची प्रिंट देखील घेऊन जावी.आणि पडताळणी समितीकडे जाऊन विहित मुदतीत आपला प्रवेश ऑनलाइन निश्चित करावा आपला प्रवेश ऑनलाईन निश्चित झाला आहे याची रिसीट पडताळणी समितीकडून घेणे आवश्यक आहे. निवड यादीतील प्रवेश पात्र बालकांच्या पालकांना त्यांच्या मोबाईलवर एसएमएस प्राप्त होतील परंतु पालकांनी फक्त एसएमएस वर अवलंबून न राहता आरटीई पोर्टल वरील अर्जाची स्थिती या टॅब वर आपला अर्ज क्रमांक लिहून लॉटरी लागली अथवा नाही याची खात्री करावी. निवड यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याची मुदत संपल्यानंतर मगच प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना अनुक्रमे एसएमएस पाठवले जातील.

त्यानंतर सर्व कागदपत्रासहित पालकांनी तालुकास्तरीय गटशिक्षण अधिकारी कार्यालय येथे स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीकडे आपल्या कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करून घ्यावयाचे आहेत. निवड समितीकडून प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे शाळेंना करून घेणे बंधनकारक असणार आहे. जर आरटीई प्रवेश देण्यास शाळा टाळाटाळ करत असतील किंवा पैशाची मागणी करत असतील तर पालकांनी शाळेविरोधात लेखी तक्रार द्याव्यात असे आव्हान मनोज जाधव यांनी केले आहे.

## थोडक्यात



पाटोदा-पवित्र हज यात्रा करूण आल्याबद्दल सभापति आसीफसेट सौदागर यांचा सत्कार दैनिक राज्य लोकतंत्र चे पत्रकार फयाज सय्यद यांनी केले

### ऑल इंडिया पँथर सेनेचा उद्या धडक मोर्चा

पाटोदा । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील दलित, मुस्लिम आदिवासी, मातंग, यांच्यावर वाढ झालेल्या अन्याय अत्याचारावर तात्काळ आळा घालण्यात यावा. दिवसाढवळ्या दलित मुस्लिम आदिवासी मातंग समाजातील लोकांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या क्रूरकर्मी जातिवाद करणाऱ्या वर तात्काळ कायद्याच्या तरतुदीनुसार कडक कारवाया कराव्यात. दीन दुबळ्या गोरगरीब मातंग मुस्लिम आदिवासी दलीत समाजावर क्रुर्ता दाखवणाऱ्या जातीवादी क्रूर करम्यावर तात्काळ कायद्याच्या तरतुदीनुसार कडक कारवाया कराव्यात. अशी ऑल इंडिया पँथर सेना च्या वतीने जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी मागणी केलेली आहे. याच अनुषंगाने तहसील कार्यालय माजलगाव येथे धडक मोर्चा आयोजित केला आहे. राजेगाव येथील बौद्ध शेतमजूर महिलांना मारहाण करणाऱ्या गावगुंडांना तात्काळ अटक करण्यात यावी. पीडित कुटुंबांना तात्काळ संरक्षण देण्यात यावे. अनुसूचित जाती जमाती भूमिहीन शेतमजुरांना दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेमधून जमिनीचे सातबारा नावावर करून देण्यात यावे. बीड जिल्हा दलित अत्याचार ग्रस्त जिल्हा म्हणून घोषित करण्यात यावा. तरी सर्व बहुजन समाजातील बांधवांनी उद्या ठीक बारा वाजता आपली उपस्थिती दर्शवून मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी व्हावे

### गुरूपोर्णिमा उत्सव साजरा

अंबाजोगाई : गुरुपौर्णिमेनिमित्त महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे प्रतिमापूजन करण्यात आले.आपल्या प्राचीन भारतातील गुरूकुल पद्धती, गुरू-शिष्य परंपरा आणि आदर्श नाते या गोष्टींची विद्यार्थ्यांना माहिती देणे हे उद्दीष्ट ठेवून प्रगती विभागातील इयत्ता पहीली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाचे गुरूकुल शिक्षण हा लघुचित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपटातून विद्यार्थ्यांनी गुरूकुलातील शिक्षण, गुरूशिष्य यांचे प्रेमळ नाते, मित्रांशी आचरण या गोष्टी द्रृकश्राव्य साधनाद्वारे प्रत्यक्ष पाहण्याचा आनंद घेतला. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी गंगाजळी समर्पित केली. संस्कार मंडळाच्या वतीने आयोजित व प्रगती विभाग प्रमुख यांचे नियोजन शिवाजी हेंडगे सर यांचे मार्गदर्शन व सर्व शिक्षकांचे सहकार्य यातून गुरूपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा झाला.





पाटोदाचे सुपुत्र रोहन शिवाजीराव भोसले यांची राज्य कर निरीक्षक आणी सहाय्यक कक्ष अधिकारी मंत्रालय पदी निवड झाल्याबद्दल स्वागत करण्यात आले त्या प्रसंगी ऊपस्तीथ पठाण अक्रम खान , नय्युम पठाण , अड.जब्बार पठान , वैभव शेट , दैनिक राज्य लोकतंत्र चे पत्रकार फयाज सय्यद

# नवअभियंत्यांना कौशल्याधारित प्रशिक्षण

## क्रेडाई महाराष्ट्र-अभियांत्रिकी महाविद्यालयाचा स्थापत्य विभाग यांच्यात सामंजस्य करार (एम.ओ.यू.)

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कौशल्यपूर्ण शहर अभियंते (सिव्हिल इंजिनिअर्स) तयार व्हावेत, या अपेक्षेने क्रेडाई महाराष्ट्र तर्फे आता भावी अभियंत्यांना कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या संदर्भात गुरूवारी अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाईचा स्थापत्य विभाग (डिपार्टमेंट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग) आणि क्रेडाई यांच्यात सामंजस्य करार (एम.ओ.यू.) झाला. त्यानुसार पुढील चार वर्षे भावी अभियंत्यांना कौशल्याधारित प्रशिक्षणासोबतच नौकरीची संधी ही उपलब्ध होणार आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांनी दिली आहे.

गुरूवार, दिनांक १८ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर येथे अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाईचा स्थापत्य विभाग (डिपार्टमेंट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग) आणि क्रेडाई यांच्यात सामंजस्य करार झाला. क्रेडाईच्या कार्यालयात अध्यक्ष प्रमोद खैरनार आणि अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाईचा स्थापत्य विभाग



(डिपार्टमेंट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग) प्रमुख डॉ.व्हि.एस.राजमान्य यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे माजी सहसंचालक डॉ.अजित थेटे हे मान्यवर उपस्थित होते. क्रेडाई महाराष्ट्र हे राज्यस्तरीय फेडरेशन आहे. क्रेडाई ही संघटीत रिअल इस्टेट डेव्हलपर्स / बिल्डर्सची सर्वोच्च संस्था आहे. या संघटनेचे महाराष्ट्रात तब्बल ३ हजारांहून अधिक सभासद आहेत. ज्यात अनेक नामांकित कंपन्यांचा, उद्योगांचा समावेश आहे. अशा प्रतिष्ठीत संस्थेसोबत अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाईचा स्थापत्य विभागाचा (डिपार्टमेंट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग) सामंजस्य करार (एम.ओ.यू.) होणे ही गौरवपूर्ण बाब आहे. यापूर्वी ही स्थापत्य विभागाने (डिपार्टमेंट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग) अनेक नामांकित कंपन्यांच्या सोबत सामंजस्य करार (एम.ओ.यू.) केले. ज्यातून स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना देशात आणि परदेशात नौकरीच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. हे विशेष होय. या अभिनव उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी म्हणाले की, काही अभियंते इंटर्नशिप करत असले तरी ती अभियंता म्हणून विषयाचे सर्वांग आकलन करून देणारी नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांना विषयाचे ३६० डिग्री सर्वांग ज्ञान मिळावे, ते पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन प्रात्यक्षिक आणि कौशल्याधारित प्रशिक्षण देणारे असावे, हा विचार करीत असताना अपस्किलिंग कार्यक्रम आम्ही तयार केला. यामध्ये बांधकामाच्या सुरूवातीच्या टप्प्यापासून ते अगदी शेवटच्या फिनिशिंगच्या टप्प्यापर्यंत सर्व बाबींचा अंतर्भावही केला आहे. प्रात्यक्षिक व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्य ती नोंद घेतली जाईल. मानवी मूल्यांसह उद्योग आणि समाजाच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी तांत्रिक ज्ञानासह विद्यार्थ्यांचे परिवर्तन सुलभ करण्याची दृष्टी देण्याचे, विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थी केंद्रीत आणि गतिमान अध्यापन - शिक्षण प्रक्रियेद्वारे शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाठपुरावा करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी स्वातंत्र्य आणि मोकळेपणाला प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये नैतिक, नैतिक मूल्ये आणि सहानुभूतीपूर्ण गुण रूजविण्याचे काम अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाई सातत्याने करीत आहे अशी माहिती ही प्राचार्य डॉ.खडकभावी यांनी दिली आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने धम्म प्रवचन मालीका व ग्रंथ वाचनास प्रारंभ

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे आषाढी पौर्णिमा ते अश्विन पौर्णीमा या वर्षावास कालावधीत दि २१ जुलै रविवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचनास व धम्म प्रवचन मालीकेस प्रारंभ करण्यात आला.या निमित्ताने भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्वच्या वतीन राबवण्यात येत आसलेल्या प्रवचन मालीकेतील आषाढी पौर्णिमा व वर्षावासाचे महत्व या विषयावर जिल्हा पर्यटन सचिव आद. के व्ही साळवे,आद.एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे यांनी सखोल मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन वंचित बहुजन आघाडीचे नेते अंकुश जाधव हे होते मेंणबत्ती प्रज्वलीत करुण भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाची प्रस्तावना वाचन करुन उदघाटन करण्यात



आले.या कार्यमासाठी जिल्हा महिला सचिवा शोभाताई भोजने,जिल्हा संस्कार सचिव श्याम वाघमारे,माजी जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान,तालुका अध्यक्ष गुलाब धाईजे,सह शिक्षक सखाराम घनघाव,शहर अध्यक्षा वंदनाताई घनघाव हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे ता संस्कार उपाध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्कार सचिव आशाताई मोरे यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभा ता सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले या कार्यक्रमासाठी मंदाताई साळवे यांनी फलआहार तर विशाखाताई वाघमारे यांनी खिरदान दिले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी.एस साळवे, दयानंद साळवे, बाबासाहेब घनघाव,राजेभाऊ साळवे,डी पी पोटभरे,डी पी वाघमारे,मोहन काकडे,विशाल साळवे,मायाताई स्वामी,सुजाता पौळ,पोटभरे ताई,रमाताई राजभोज, तात्यासाहेब साळवे,नितीन डोंगरे,सिद्धांत साळवे,वैभव साळवे व भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# पारगाव(घु)येथे कायदेविषयक शिबिर

पाटोदा- दिनांक २०/०७/२०२४ रोजी पारगांव घुमरा येथे विधी सेवा समिती पाटोदा व वकिल संघ पाटोदा यांचे संयुक्त विदयमाने बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा २०१५, बालकांचे हक्क, बेटी बचाओ बेटी पढाओ, शिक्षणाचा अधिकार, लोकअदालत माहिती ई. कायदे विषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा दरम्यान पाटोदा न्यायालयात दिनांक २७/०७/२०२४ रोजी होणा-या लोक अदालतचे पॉम्पलेट वाटप करुन व दिनांक २७/०७/२०२४ ते ०३/०८/२०२४ रोजी होणा-या विषेश लोक अदालतचे पोस्टर प्रसिद्ध करुन जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमात मा.दिवाणी न्यायाधीश पाटोदा श्रीमती एस.एन.निकम मॅडम यांनी बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा २०१५, बालकांचे हक्क या विषयी मार्गदर्शन केले व मा. सह दिवाणी न्यायाधीश पाटोदा ए.ए.पाटील मॅडम यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ, शिक्षणाचा अधिकार या विषयी मार्गदर्शन केले. तसेच पाटोदा वकील संघाचे विधीज्ञ आर. जी.औटे यांनी लोकअदालत





बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कायदेविषयक शिबिराचे प्रास्ताविक व सूत्र संचालन विधीज्ञ एस.एन. घूमरे यांनी केले. सर्वाचे आभार विधीज्ञ एस.बी.जावळे मानले . या कार्यक्रमास वकील संघाचे अध्यक्ष विधीज्ञ एस. एस.कोठेकर साहेब, विधीज्ञ यू.बी.जाधव,विधीज्ञ ए.एस. वैद्य,विधीज्ञ बी.डी.तळेकर, विधीज्ञ एस.एन.घूमरे,विधीज्ञ एस.बी जावळे,विधीज्ञ एस.बी.थोरवे,विधीज्ञ बी.बी. जावळे ,विधीज्ञ टी.डी. जाधव विधीज्ञ महेश बेदरे व पाटोदा वकील संघाचे सदस्य, विस्तार अधिकारी गोड़े साहेब, गावातील सरपंच घुमरे मैडम, ग्रामसेवक नागरगोजे साहेब,गावतील नागरीक या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित होते.

# फोर-जी,फाईव्ह-जी च्या जमान्यात ग्रामीण भागातील रेडिओ झाला कालबाह्य

## टेलीव्हीजनच्या आधुनिकीकरणामुळे घराघरांत टिव्ही व स्मार्ट फोनचा परीणाम

ज्योतीराम पांढरपोटे

माजलगाव:- पुर्वी १९७०-८० च्या दशकातील ग्रामीण भागातील नागरिकांना करमणुकीचे कोणत्याही प्रकारची साधन सामुग्री त्याकाळी उपलब्ध नसल्याने जगात काय चाललंय हे नागरिकांना माहिती होत नसायचं परंतु १९७०-८० च्या दशकात रेडीओ (आकाशवाणी) मुळे ग्रामीण भागातील नागरिकांना करमणुकीचे साधन सामुग्री उपलब्ध झाल्याने राज्यासह देशातील व जगातील होणाऱ्या घडामोडींची माहिती ग्रामीण भागातील नागरिकांना रेडीओ वरील बातम्याच्या माध्यमातून होत होती.त्याचबरोबर करमणुकीसाठी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत गाणे देखील ऐकायला मिळत होते,परंतु टेलीव्हीजनच्या आधुनिकीकरणामुळे ग्रामीण भागात प्रत्येकांच्या घरा-घरात टिव्ही,एल.ई.डी.व स्मार्ट फोन मुळे रेडीओ दुर्लक्षीत झाला आणी ४-जी,५जी च्या जमान्यात रेडिओ ग्रामीण भागातून जवळ जवळ कालबाह्य झाला आहे.

पुर्वी ग्रामीण भागात नागरीकांना शेतीच्या कामातुन विरंगुळा व्हावा म्हणुन त्याकाळी कोणत्याही प्रकारचे करमणुकीसाठी साधन सामुग्री उपलब्ध नव्हती, त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना राज्यासह देशात व परदेशात होणाऱ्या घडामोडींची माहिती त्याकाळी उपलब्ध नसायाची मात्र त्याकाळी लागलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या शोधानी रेडीओ आकाशवाणीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना करमणुकीचे साधनांना बरोबरच त्याकाळातील हिंदी व मराठी चित्रपटातील गाणी देखील ऐकायला मिळत असायाची, त्यामध्ये रेडीओवर दररोज सकाळी ६:०० ते ७:०० वाजेपर्यंत भक्तगीते असायाची त्यानंतर ७:०० ते ७:१५ वाजेपर्यंत बातम्या असायाच्या त्यानंतर ७:१५ ते ९:०० वाजेपर्यंत विविध मनोरंजनाचे कार्यक्रम असायचे,तर दुपारी १२:०० ते १२:३० वाजेपर्यंत अर्धातास आपली आवड,या कार्यक्रमात मराठी चित्रपटातील मराठी गीते,तर १२:३० ते दुपारी १:३०





### ''मन की बात'' मुळे रेडिओशी कनेक्ट

पूर्वी रेडिओ हे संवादाचे प्रभावी माध्यम होते. देशाच्या,जगातील आणि करमणुकीच्या बातम्या रेडिओवरून प्रसारित केल्या जात होत्या आणि लोक ते ऐकण्यासाठी उत्सुक असायचे तसेच रेडिओवर कार्यक्रम प्रसारित होण्याची वाट पाहत होते.तथापि, अलिकडच्या वर्षांत रेडिओची उपयुक्तता कमी झाली आहे,हे असूनही, रेडिओद्वारे प्रदान केलेल्या सेवांमधील बदलांमुळे,तो लोकांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे कारण तो ब्रॉडबँड, टॅब्लेट आणि मोबाइलद्वारे सहज उपलब्ध आहे.इतकेच नाही तर २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेडिओवरून दर रविवारी मन की बात कार्यक्रम प्रसारित करून लोकांना रेडिओशी कनेक्ट राहण्याची संधी दिली.

### रेडिओचा सुवर्णकाळ

१९२० ते १९५० हा रेडिओचा सर्वाधिक चांगला किंवा सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. या काळात वेगवेगळे तंत्रज्ञान विकसित झाले.पुढे १९५५ नंतर तर रेडिओ अनेकांच्या पसंतीस उतरले कारण,त्यावर असणारे वेगवेगळे कार्यक्रम लोकप्रिय झाले.लोक रेडिओपासून दूर राहणे पसंत करत नव्हते.त्यात 'सदाबहार गाण्यांचा कार्यक्रम' म्हणजे लोकांचा जीव की प्राण झाला होता. टिव्ही येण्याआधी मनोरंजन आणि माहिती आदानप्रदान करण्यात रेडिओ एकमेव साधन म्हणून लोकप्रिय होते.पारतंत्र्याच्या काळात रेडिओच्या माध्यमातून लोकांशी संवाद साधला जात होता.

**रेडिओ ची फायदे :** रेडिओ प्रसारण हा भारताच्या संस्कृतीचा एक मोठा भाग होता आणि देशाच्या कानाकोपऱ्यात कोणताही संदेश पोहोचवण्याचे ते एक मोठे माध्यम होते.देशातील शेतकर्यांना शेती, हवामान आणि इतर देशाशी निगडीत विषयांची सविस्तर माहिती मिळू शकली आणि परदेशातील माहिती देशातील नागरिकांपर्यंत सहज पोहोचू शकली.

१८९५ मध्ये रेडिओचा शोध लागला आणि नव्या क्रांतीचा उदय झाला.त्यावेळी त्याला 'फादर ऑफ रेडिओ' अस म्हटले जाऊ लागलं.अस असले तरी भारतात रेडिओ येण्यासाठी तब्बल ३३ वर्षे लागली.भारतावर राज्य गाजवणाऱ्या इंग्रजांनी २३ जुलै १९२७ रोजी पहिल्यांदा रेडिओ आणला.त्यावेळी मुंबई आणि कलकत्ता या दोन शहरातच तो ऐकायला मिळायचा.

### १३ फेब्रुवारी जागतिक रोडीओ दिवस म्हणून साजरा

मोबाईल फोन, इंटरनेट,टेलिव्हिजन आणि संगणकाच्या युगात रेडिओ कालबाह्य झाला असूनही,रेडिओच्या सर्व वैशिष्ट्यांमुळे आणि त्याच्या गौरवशाली इतिहासाच्या स्मरणार्थ तो लोकांच्या जीवनाचा एक भाग बनला आहे. आणि, रेडिओचा गमावलेला स्वाभिमान पुनर्संचयित करण्यासाठी, १३ फेब्रुवारी हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून नियुक्त केला गेला आहे.

पर्यंत आपकी फरमाईश या कार्यक्रमात हिंदी चित्रपटसृष्टीतील गाणी असायाची त्यामुळे त्याकाळी ज्यांच्याकडे रेडीओ असे तो त्याकाळी गर्भश्रीमंत समजायचे त्यामुळे त्याकाळी ग्रामीण भागातील विवाह जमामवतांना मुलीच्या वडिलांनी नवरदेवाला हुंडा देण्याची पारंपरिक पध्दत असायांची,या पारंपारिक पद्धती बरोबरच त्याकाळी नवरदेवाला लग्नात शेवंतीला रेडीओ देण्याची परंपरा देखील सुरु झाली.

त्याकाळी एखाद्या लग्नात शेंवतीला नवरदेवाला रेडीओ नाही दिला तर नवरदेव शेंवतीचे कपडे घालतच नसायचा, त्यावेळी नवरदेव रुसला असे म्हणावयाचे, आणी त्या नवरदेवाला रेडीओ दिल्याशिवाय लग्न लागतच नसायचे, त्यामुळे ग्रामीण भागात त्याकाळी रेडीओ एवढा फेमस असायाचा की, दिवसभर ग्रामीण भागातील शेतकरी शेतात काम करुन रात्री गावात आले की,ज्यांच्याकडे रेडीओ असायचा तो गावातील पारावर, ग्रामपंचायत, किंवा सार्वजनिक ठिकाणी बसायाचा त्या ठिकाणी गावातील ग्रामस्थ त्यांच्याकडे जाऊन रात्री ७:०० वाजण्याच्या बातम्या ऐकायाच्या आणी सकाळी ७:०० वाजण्याच्या बातम्या न विसरता ऐकायाचे.त्यामुळे त्याकाळी ग्रामीण भागातील नागरिकांना राज्यासह देशातील व परदेशातील दररोज होणाऱ्यां घडामोडींची माहिती नियमितपणे रेडिओ च्या माध्यमातून मिळत असे, त्याकाळी रेडिओ हा ग्रामीण भागातील करमणुकीचे साधन म्हणून अविभज्य घटकच बनल्याने रेडिओचा मोठा श्रोतावर्ग होता.परंतु कालांतराने टेलीव्हिजनच्या आधुनिकीकरणामुळे ग्रामीण भागात प्रत्येकांच्या घरा-घरात टिव्ही, एल.ई.डी.व स्मार्ट फोनच्या ४-जी,५-जी.च्या जमान्यात रेडीओ कालबाह्य झाल्यातच जमा झाला आहे.

# परळीच्या बरोबरीने बीडला निधी देणार-ना.धनंजय मुंडे

## बीडमध्ये प्रवक्तेपदी निवडीबद्दल धनंजय मुंडेंचा डॉ.योगेश क्षीरसागरांनी केला सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभेत पराभव झाला असला तरी जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबध्द आहोत. जिल्ह्यातील विधानसभेच्या सर्व जागा महायुती जिंकणार आहे. पूर्वी मुख्य लढत परळीची असायची, आता ती बीडची असेल. जिल्ह्यात सर्व घटकांसाठी भरीव निधी दिला. यापुढे परळीला जेवढा निधी येईल, त्या बरोबरीने बीडला दिला जाणार आहे, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी निवडीबद्दल पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचा सत्कार आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश सोहळा बीड शहरातील के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात शनिवारी (दि.२०) सायंकाळी १० वाजता उत्साहात झाला. यावेळी सत्कारमूर्ती म्हणून ना.मुंडे हे बोलत होते.

व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर,



जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, अल्पसंख्याक सेलचे बीड जिल्हाध्यक्ष इकबाल सय्यद, जिल्हा संघटक सिद्दिकी सादेक, माजी सभापती काकासाहेब जोगदंड, नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक जैतुल्ला खान, बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, बाळासाहेब गुंजाळ, ड.विकास जोगदंड, शुभम धूत, सय्यद इलियास, मुन्ना इनामदार, प्रेम चांदणे, रविंद्र कदम, सरपंच अमोल बागलाने आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक आघाडीच्यावतीने विशाळगड प्रकरणी ना.धनंजय मुंडे यांना निवेदन दिले.

पुढे बोलताना ना.धनंजय मुंडे म्हणाले, राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत होत आहे. लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर बीडमध्ये पहिलाच कार्यक्रम होत आहे. तो पराजय जिव्हारी लागणारा असून त्यावर मात करायची असेल तर आगामी निवडणुकीतील विजय सुनिश्चित करावा लागेल. मी पुरोगामी कार्यकर्ता असून कधीही जात-पात पाहिली नाही, मला ही स्व.गोपीनाथ मुंडे यांनी शिकवण आहे. तरीही आमची जात पाहून पराभव केला. हे आगामी राजकारणासाठी चांगले नाही. त्यामुळे आता तरी विकासावर निवडणुका व्हाव्यात, आपल्या भागातून विकास करण्याची क्षमता असलेल्या नेतृत्वाला संधी द्यावी. आजपर्यंत अनेक निवडणुका पाहिल्या, परंतु एखाद्याला पाडायचे म्हणून झालेली ही लोकसभेची निवडणूक झाली. तरीही मोठे मताधिक्य दिल्याबद्दल जनतेचे आभार मानतो. ना.अजित पवारांनी ऐतिहासिक अर्थसंकल्पातून लाडकी बहिण योजनेची घोषणा केली आहे. या योजनेची नोंदणी करण्यात राज्यात बीड जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. हा आर्थिक लाभ रक्षाबंधनापूर्वी थेट खात्यात जमा होणार आहे. पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या योजनेत अधिकाधिक नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. शासनाच्या अशा योजनांचा लाभ देण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर हे प्रयत्नशील असतात. यासोबतच त्यांनी ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या रोजगार मेळावा, आरोग्य शिबिरासह इतर सामाजिक उपक्रमांचे तोंडभरून कौतुक केले. प्रास्ताविक डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार नवगण संस्थेचे संचालक आमेर काझी यांनी मानले.

### डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधानसभा उमेदवारीचे संकेत

जिथे ज्या पक्षाचा आमदार, ती जागा त्याच पक्षाची असे सुनिश्चित झाले आहे. त्यामुळे उर्वरित जागांची वाटाघाटी होईल. अद्याप माझीही परळीची उमेदवारी जाहीर झालेली नाही. त्यामुळे योग्यवेळेला योग्य उमेदवाराची घोषणा होईल, असे ना. मुंडे यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे नजर रोखून वक्तव्य केले. त्यामुळे एकप्रकारे त्यांनी उमेदवारीचे संकेत दिले आहेत.

### माजी मंत्री, आमदार समर्थकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

नाळवंडी गणाचे पंचायत समितीचे माजी सदस्य अच्युतराव शेळके, मुस्लिम समाजाचे नेते सय्यद जकी, रा.काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे एससी सेलचे बीड तालुकाध्यक्ष विनोद उर्फ दादा हातागळे, वांगीचे सरपंच अशोक वाघमारे, पिंपळगावचे उपसरपंच संतोष तेलप, रुईगव्हाणचे ग्रा.पं.सदस्य बालाजी नाईकवाडे, लिंबारुईचे युवराज ठाणगे, माजी नगरसेवक सुनील महाकुंडे, अंजनवतीचे उपसरपंच आप्पा मोरे, सदस्य पांडुरंग येडे, लोणीघाटचे माजी सरपंच भास्कर जाधव, काळेगाव हवेलीचे सरपंच भारत कानाडे, भोई समाज संघटनेचे अध्यक्ष दत्ता गुणवंत यांच्यासह माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि आमदार समर्थक असलेल्या कार्यकर्त्यांनी रा.काँ.पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांचे ना.धनंजय मुंडे, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्वागत केले.

# वृक्षारोपणासाठी युवकांनी पुढाकार घ्यायला हवा -ॲड. अजित देशमुख

जातेगाव । प्रतिनिधी

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्ष लागवड आणि वृक्ष संगोपन मोठ्या प्रमाणात झाले पाहिजे. जेवढी झाडांची लागवड होईल, तेवढं पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मदत होईल. या कामात युवकांचा पुढाकार महत्त्वाचा असून जातेगाव येथे विशाल पांढरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केल्यामुळे सरकारी दवाखाना, शाळा आणि बाजार तळ परिसरात चांगली झाडे वाढत आहेत. त्यामुळे गावकऱ्यांनी झाडे जगवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे मत जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी व्यक्त केले.

सध्या पावसाळा चालू आहे. पाऊस बऱ्यापैकी पडत आहे. त्यामुळे उंच वाढलेली झाडे प्रत्येक गावात शाळा आणि रस्त्यावर लावणे आवश्यक आहे. झाडांमुळे त्या परिसराची शोभा तर वाढतेच. मात्र पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्ष लागवड मोहीम



ही काळाची गरज आहे. जातेगावच्या तरुणांनी एकत्र येऊन स्वखर्चातून शासकीय दवाखान्याच्या परिसरात त्याचप्रमाणे शाळेच्या परिसरामध्ये चांगल्या प्रकारची वृक्ष लागवड केली. आज त्यांनी बाजार तळावर वृक्ष लागवड केली. अशाच प्रकारचे वृक्ष गावातील प्रत्येक नागरिकांनी आपापल्या दारात लावले तर गावात वृक्षांची संख्या वाढेल. यापासून सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी देखील मदत होईल. त्यामुळे युवकांचा आदर्श घेऊन गावातील प्रत्येकाने एक तरी वृक्ष लावावे, असे आवाहन देखील ॲड. देशमुख यांनी केले आहे.

साहेबराव पांढरे, शंकर पवार, प्रा. अंकुशराव चव्हाण, शिवाजीराव चव्हाण, गोरखराव चव्हाण, भागवत ढोरमारे, सतीशराव चव्हाण, दत्ता वाघमारे, राधेश्याम लेंडाळ, रुद्रा घोलप, बळीराम चव्हाण, मच्छिंद्र चव्हाण, भास्कर जिजा चव्हाण, मुरलीधर चव्हाण, भाऊसाहेब चव्हाण, अण्णासाहेब चव्हाण, नारायणराव चव्हाण, दादासाहेब चव्हाण, रामेश्वर जिजा चव्हाण, महेश चव्हाण सर पंजाब धोंडरे राधेश्याम धोंडरे, सुरेश कारके, पत्रकार सुनील मिसाळ, अभय पांढरे, गणेश पवार, जानू पवार, करीम शेख, बाबुराव चव्हाण यांच्यासह अन्य यावेळी उपस्थित होते. या सर्वांनी लक्ष लागवडीमध्ये सहभाग नोंदला त्यामुळे या सर्वांचे देखील देशमुख यांनी अभिनंदन केले

# खोटे शपथपत्र अन् मृत्यूपत्र बनवून जमीन लाटली

## भावानेच भावाला दिला धोका; सेवानिवृत जवान नऊ वर्षापासून न्यायाच्या प्रतिक्षेत

**केज । प्रतिनिधी**

खोटे शपथपत्र अन्? मृत्यूपत्र बनवून जमिन लाटल्याचा प्रकार केज तालुक्यातील पैठण (आनेगाव शिवार) येथे घडला आहे. पैठण येथील सेवानिवृत्त जवान गौतम चौधरी यांना त्यांच्याच भावांनी धोका देवून जमिन लाटली आहे. यासंदर्भात ते मागच्या नऊ वर्षांपासून न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना अद्याप न्याय मिळालेला नाही, देश सेवेसाठी लढलेल्या या जवानावर होत असलेल्या अन्यायाला वाचा कधी फुटणार?, वेळेत न्याय मिळत नसल्यामुळे गौतम चौधरी आणि त्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत.

याबाबत जवान गौतम चौधरी यांनी लेखी स्वरूपात याप्रकरणाशी संबंधित माहिती सादर केली आहे. सेवानिवृत जवान गौतम आत्माराम चौधरी यांना पॅरामिलिटरी सीआरपीएफ जम्मू कश्मीर श्रीनगर इथे दोन गोळ्या लागल्या होत्या, यातील एक गोळी छातीतून आरपार आणि दुसरी पोटाच्या उजव्या बाजुला लागली होती, देश सेवेसाठी ते कधीच मागे हाटले नाहीत, देशासाठी लढा देणाऱ्या याच जवानाला अन्यायाशी तोंड द्यावे लागत आहे. जमीन प्रकरण परत घेण्यासाठी गेल्या नऊ वर्षापासून त्यांचा आणि त्यांच्या कुटूंबियांचा छळ केला जात आहे. चौधरी यांना त्यांच्याच भावांनी फसवून त्यांची जमीन बळकावली आहे. पहिल्या क्रमांकाचा भाऊ बाबासाहेब चौधरी, आणि दुसऱ्या क्रमांकाचा भाऊ रामकीसन आत्माराम चौधरी याने सदर जवानाच्या वडिलांना (आत्माराम चौधरी) हॉस्पिटलचा बहाना करूण रामकीसनने त्याच्या ड्युटीच्या गावी नेले आणि तिथे खोटे शपथपत्र वे मृत्यूपत्र बनवले. परंतु जन्म गावी, तालुक्यात आणि बीड जिल्हात खोट्या कामासाठी एकही साक्षीदार सापडला नाही. म्हणून इतर जिल्हा उस्मानाबाद येथे गेले व साक्षीदार दूसरे कोणी नसून जवान चौधरी यांचे थोरले बंधू बाबासाहेबांचे सासरे व सासरे यांचे भाऊ. (१. अभिमान नारायण राखुंडे, २. हरिश्चंद्र नारायण राखुंडे रा. खडकी, ता. कळंब, जि. उस्मानाबाद.) हे आहेत, त्याचप्रमाणे या कामात रामकीसन, बाबासाहेब यांना (बहीण) बिजयमाला भास्कर पाडेने यांनी सहकार्य केले आहे. याप्रकरणी २०१५ (सखाराम आत्माराम चौधरी विरुद्ध बाबासाहेब आत्माराम चौधरी) मध्ये केस दाखल केली. परंतु वादी गेल्या ०९ वर्षापासू न्याय मिळत नाही, वास्तविक पाहता शपथपत्र आणि मृत्युपत्रासाठी स्वतंत्र आणि निष्पक्ष साक्षीदारांची साक्ष घेणे आवश्यक आहे. जे या प्रकरणाशी संबंधित नाहीत आणि ज्यांचा या प्रकरणात वैयक्तिक स्वार्थ नाही. परंतु बाबासाहेब आणि रामकीसनने शपथपत्र आणि मृत्युपत्रावर सासरच्या / नातेवाईकांची साक्ष घेतली आणि जवान गौतम चौधरी सोबत भेदभाव/पक्षपात केला. त्यामुळे जवान गौतम चौधरी कर्जबाजारी झाला आणि आर्थिक परिस्थिती बिकट झाली. या परिस्थितीवर मात करण्यासाठीच ते गेल्या ०९ वर्षापासू न्याय मागत आहेत. जवान गौतम चौधरीवर ◀◀ पान ३ वर

# शासकीय मालमत्तेची चोरून विक्री

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय मेडिकल परिसर मध्ये वर्ग ४ कर्मचारी यांची निवस्थाने ही जीर्ण झाली असल्यामुळे ती निवासस्थाने पाडून त्या ठिकाणी नवीन निवासस्थाने बांधण्याच्या कामाला महाराष्ट्र शासनाने परवानगी दिली आहे. त्याकरिता सध्या सार्वजानिक बांधकाम उपविभाग मेडिकल परिसर च्या मार्फत ही जुनी सवार क्वार्टर व वर्ग ४ निवासस्थाने पाडण्याचे काम चालु आहे.

या इमारती व जुन्या क्वार्टर पाडल्या नंतर या इमारती मध्ये व क्वार्टर च्या छतामधील लोखंडी गज, लोखंडी खिडक्या, लोखंडी जाळी, लाकडी दरवाजे, लाकडी खिडक्या, नगरपालिका च्या वतीने गार्डन साठी लोखंडी जाळी व पाईप हे सर्व महाविद्यालय व रुग्णालय मधील कर्मचारी, कंत्राटदार यांच्या संगनमताने हे सर्व मटेरियल प्रशासनाची व कार्यालयाची परवानगी न घेता परस्पर, बेकायदेशीर रित्या रात्री बे रात्री काढून चोरून नेऊन विकत आहेत. आशा शासकीय मालमतेचे

नुकसान करत आहेत. शासकीय मालमत्ता चोरून बेकायदेशीर विकणे हा कायद्याने गुन्हा असुन संबंधित कर्मचारी, कंत्राटदार यांची चौकशी करुन दोषीवर योग्य कार्यवाही करावी, तसेच बेकायदेशीर रीत्या विक्री केलेली शासकीय मालमत्ता



पोलीस प्रशासनाच्या मदतीने शोधून ती तात्काळ जप्त करावी व रीतसर त्याचा पंचनामा करावा. आणि आपल्या अधिष्ठता कार्यालय अधिपत्याखाली सार्वजनिक बांधकाम विभागाचे कामकाज पाहणे साठी जो कर्मचारी नियुक्त करण्यात आला आहे त्याची योग्य चौकशी करून दोषी आडल्यास संबंधित कर्मचाऱ्याचा पदभार काढून घेऊन त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी.असे वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# श्री बजरंगबली वेताळ मंदिरात गुरुपौर्णिमा साजरी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

येथील बारा ज्योतिर्लिंगाच्या नजीक असलेले श्री वेताळ मंदिर येथे आज रविवार दिनांक २१ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

आज रविवार श्री वेताळ मंदिर येथे गुरुपौर्णिमा निमित्त श्री विलासानंदजी महाराज यांच्या हस्ते गुरुप्रतिमा, पादुकांचे पूजन करण्यात आले. यावेळी महिला भजनी मंडळांनी भक्तिगीते, भजन गायीले. गुरुपौर्णिमेनिमित्त श्री वेताळ मंदिर सुंदर व आकर्षक विद्युत रोषणाईने सजविण्यात आले होते. मंदिरांत भाविकांची दिवसभर वर्दळ होती. मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आज रविवार गुरुपौर्णिमेनिमित्त श्री वेताळ मंदिर असल्याने भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी गर्दी केली. दुपारी महाप्रसादाने गुरुपौर्णिमा उत्साहाची सांगता झाली.

# प्रयोगातून विज्ञान उपक्रमास प्रतिसाद

## पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राचा पुढाकार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित पू.बाबासाहेब विज्ञान केंद्राच्या वतीने संस्थांतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रयोगातून विज्ञान हा प्रेरणादायी उपक्रम घेण्यात आला त्यास विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला जळगाव येथील विज्ञानाचे निवृत्त प्रा. दिलीप भारंबे, आर.ए.पाटील,यो.शि. संस्थेचे सहसचिव भीमाशंकर शेटे, संचालक प्रा.अभिजित लोहिया,लंकेश वैद्य, शालेय पदाधिकारी उपस्थित होते.



प्रा.भारंबे,प्रा.पाटील यांनी भौतिकशास्त्रामध्ये जड वाटणाऱ्या अवघड जाणाऱ्या विविध संकल्पना साध्या प्रयोगातून सहजपणे समजावून सांगितल्या. या कार्यक्रमात प्रा. भारंबे यांनी प्रकाशाविषयीचे नियम, रिफ्लेक्शन, रिफ्रॅक्शन, टोटल इंटरनल रिफ्लेक्शन,ऑप्टिकल फायबर,सेंट्रलफोर्स , सेंट्रीफ्युगल फोर्स,लेन्स लॉ,एलेक्ट्रोमॅग्नेटिक इंडक्शन, पॅरिस लॉ, इलेक्ट्रिक मोटर, विद्युत जनरेटर,आर्किमिडीज प्रिन्सिपल,मल्टिपल इमेजेस ,इनफिनीट इमेजस,पृष्ठीय तणाव, सरफेस टेन्शन असे अनेकविध प्रयोग केले.

तर जीवशास्त्रीय प्रयोगात प्रा.आर.ए.पाटील यांनी सुक्ष्मदर्शकाची रचना समजावून सांगत कांदयाच्या पेशीच्या स्लाइड कशा बनवाव्या याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कांदयाच्या पापुद्र्यातील वनस्पती पेशी सुक्ष्मदर्शकातून पाहण्याचा अनुभव नववी व दहावीच्या विद्यार्थिनींनी घेतला.

# ३० लाखाची फसवणूक : शाहीनाथ परभणेंसह चौघावर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील ज्ञानराधा, साईराम यासह अन्य काही मल्टिस्टेट दिवाळखोरीत निघाल्या. यामुळे खातेदार चांगलेच अडचणीत निघाले. पैशासाठी खातेदार बँकांच्या दारात दररोज जावून बसतात मात्र त्यांना पैसे मिळत नाहीत. बीड शहरातील साईराम बँकेच्या अध्यक्षासह चौघा जणांवर गुन्हा दाखल झाला. मुदतठेवची रक्कम वेळेवर दिली नसल्याने साईराम परभणे यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारदाराची ३० लाख २६ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

शहरातील पांगरी रोड परिसरात राहणार्या योगेश हनुमान गव्हाणे यांनी काही महिन्यांसाठी साईराम मल्टिस्टेटमध्ये रक्कम ठेवली होती. या रकमेची मुदत संपून सदरील ही रक्कम ३० लाख २६ हजार ६७१ रुपये झाली. पैशासंदर्भात ते वेळोवेळी बँकेमध्ये जात असते. मात्र त्यांना पैसे मिळत नाहीत. साईराम मल्टिस्टेट बँक ही दिवाळखोरीत निघाल्याने ती बंद करण्यात आली. आपले पैसे मिळत नसल्याने गव्हाणे यांनी शिवाजीनगर ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली. त्यानुसार अध्यक्ष शाहीनाथ विक्रम परभणे, साधना शाईनाथ परभणे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक शाईनाथ परभणी, व्यवस्थापक बनकर यांच्या विरोधात कलम ३१८ (४), ३१६ (२), ३१६ (५), ३३६ (२), ३३८, ३४० (२) भा.दं.वि.नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ॲड शेख शफीक भाऊ यांनी मानले मुस्लिम समाजाचे आभार

## मुस्लिम समाजाने आपल्या धैर्याची आणि शांततेची साक्ष दिली

बीड । प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड मधील गजापूर येथे माथेफिरू उग्रवाद्यांनी पवित्र जामा मशीद आणि कब्रस्तानची तोडफोड तसेच मुस्लिम वस्त्यांची जाळपोळ केल्याच्या निषेधार्थ बीड शहरातील बशीरगंज चौकात एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी बीड च्या सर्व नागरिकांना शुक्रवार दिनांक १९ जुलै २०२४ रोजी दुपारी ०२:३० वाजता या हल्ल्याचा निषेध नोंदविण्याकरिता एकत्रित येऊन आपला शांतते घोषणा बाझी करत रोष शासन-प्रशासनासमोर व्यक्त करावा असे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधवांसोबतच सर्व धर्मीय बांधव सामील झाले होते. आपल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन हजारोंच्या संख्येने जमा होऊन निषेध नोंदविल्याबद्दल शफिक भाऊंनी सर्वांचे मनस्वी तसेच पोलिस प्रशासनचे ही आभार व्यक्त केले आहे.



यापूर्वी बीड शहराच्या बशीरगंज चौकात मराठा क्रांती मोर्चा वगळता कधीही कोणत्या आंदोलनात किंवा सभेत एवढा मोठा चारी रस्ते व्यापून टाकणारा जनसागर कधीही उसळला नव्हता. जेवढा विशाळगडच्या गजापूर येथील घटनेचा निषेध व्यक्त करण्याकरिता उसळला. कारण गजापूर ला मशिदीवर केलेला हल्ला समाजात दुही निर्माण करून सर्वधर्म समभाव, बंधुभाव, हिंदू-मुस्लिम भाई-भाई याला तिलांजली देणारा आहे. परंतु असे कितीही माथेफिरू उग्रवादी राक्षस समोर येऊन काहीही करू लागले तरी भारतीय जनता त्याचे समर्थन करत नाही. मग ते कोणत्याही जाती-धर्माचे असो. हीच भारतीय जनतेची एकजूट देशाची एकता अखंडता मजबूत ठेवते. याचाच प्रत्यय बीड जिल्ह्यातील जनतेने शुक्रवारी ◀◀ पान ३ वर

### माता भगिनींनी घरून दुवा केली!

**बीड शहरातील बशीरगंज चौकात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात निषेध आंदोलन करण्यात येत होते. हे आंदोलन व्यवस्थित व सुखरूपरीत्या पार पडावे याकरिता हजारो माता-भगिनींनी घरी बसून दुवा केली तर तरुण, आबालवृद्धांनी हजारोंच्या संख्येने आंदोलन स्थळी बशीरगंज चौकात येऊन आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. शफिक भाऊंच्या नेतृत्वात मुस्लिम समाज गट,तट,पक्ष अशा कृत्रिम भिंती तोडून एकवटला.**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# खडकवासला विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावा -पदाधिकाऱ्यांची मागणी

**पुणे। प्रतिनिधी**

खडकवासला विधानसभा मतदारसंघ हा महायुतीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावा, अशी मागणी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पदाधिकाऱ्यांतर्फे करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांची खडकवासला विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या सर्व प्रमुख पदाधिकारी व माजी नगरसेवक यांनी त्यांची जाऊन सदिच्छा भेट(झीींपश) घेतली.



गुरुपौर्णिमेच्या व उद्या त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच शुभेच्छा देत असताना या आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये खडकवासला विधानसभा मतदार संघ हा महायुतीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला त्या ठिकाणी मिळावा. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा उमेदवार या मतदारसंघात देण्यात यावा, अशी विनंती सर्वांच्या वतीने एकमताने करण्यात आली. अजित पवार यांना दिलेले विनंती पत्र व सर्व पदाधिकाऱ्यांच्या सह्या असलेले पत्र त्यांनी वाचून घेऊन एक सकारात्मक प्रतिसाद आम्हास दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मधील खडकवासला मतदारसंघातील सर्व प्रमुख पदाधिकारी व माजी नगरसेवक यांनी एकत्रित येऊन होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या मध्ये खडकवासला विधानसभा मतदारसंघ आपल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला मिळावा, असा प्रस्ताव मांडण्यात आला. अजित पवार यांनी सुद्धा या मागणीला दुजोरा देऊन महायुतीच्या नेत्यांची ज्या वेळेस जागा वाटपा संदर्भात बैठक होईल, त्या बैठकीत या पत्राचा संदर्भ देऊन आपली मागणी मी त्या बैठकीमध्ये मांडेन, असे आश्वासन या पदाधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीला रुपाली चाकणकर, खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष प्रदीप उर्फ बाबा धुमाळ, दिलीपभाऊ बराटे, दत्तात्रय धनकवडे, विजय आप्पा रेणुसे, शुक्राचार्या वांजळे, विकास दांगट, अक्रूर कुदळे, शैलेश चरवड, प्रवीण शिंदे, सायली वांजळे, पुणे महापालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या दिपाली धुमाळ, सुवर्णा पायगुडे, युवराज बेलदरे, प्रकाश कदम, शंकर उर्फ बंडू केमसे, अश्विनी भागवत, सागर भागवत, राजेंद्र पवार, बाळासाहेब कापरे, दिवाकर पोफळे, मयूरेश वांजळे यावेळी उपस्थित होते.

## आयुक्त शेखर सिंह यांच्यासह महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केली राहत्या घराची स्वच्छता; शहर डेंग्यूमुक्त करण्याचा निर्धार

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर डेंग्यूमुक्त करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतःच्या राहत्या बंगल्याची स्वच्छता करत या मोहिमेत सहभाग घेतला. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनीही आपले आरोग्य ही आपलीच जबाबदारी समजून राहत्या घरांची साफसफाई केली असून नागरिकांनी आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी बीट डेंग्यू सूत्राचा अवलंब करावा,असे आवाहन आयुक्त शेखर सिंह(झउचउ) यांनी केले आहे.



शहराला डेंग्यू मुक्त करण्यासाठी महापालिकेच्या वतीने डेंग्यू मुक्त पिंपरी-चिंचवड शहर ही मोहीम राबविण्यात येत असून त्यानुसार नागरिकांनी आठवड्यात एका दिवसातील एक तास आपल्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी आपल्या राहत्या घरी स्वच्छता करायची आहे. या डेंग्यूमुक्त मोहिमेत आज महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवत घरातील कुलर, फ्रीज, पाणी साठवणुकीची भांडी, झाडांच्या कुंड्या, घराच्या परस बागेची स्वच्छता केली.

डेंग्यू मुक्त पिंपरी चिंचवड शहर म्हणजेच बीट डेंग्यू या मोहीमेत जागरूकता वाढवण्यासाठी आणि डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आठवडाभर चालणाऱ्या उपक्रमांचा समावेश आहे. तसेच डेंग्यूबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि डेंग्यूला रोखण हे महापालिकेचे उद्दिष्ट असून नागरी समुदायाच्या सहभाग वाढविण्यावर आणि आंतरविभागीय समन्वय राखण्यासाठी ही मोहिम उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांचा सहभाग यामध्ये महत्वाचा असून डेंग्यूला रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत नागरिकांनी जागरूक असणे गरजेचे आहे, असे आयुक्त शेखर सिंह(झउचउ) म्हणाले.

नागरिकांचे आरोग्य सुदृढ कसे ठेवता येईल यासाठी महापालिका सर्व प्रयत्न करत आहे. नागरिकांनी देखील या मोहिमेत सहभागी होऊन आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी 'बीट डेंग्यू' या संकल्पनेचा अवलंब करावा आणि आपले घर व परिसर स्वच्छ व कोरडे ठेवावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे

# महिलेला फेसबुकवरची ओळख पडली महागात

### १२ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

फेसबुकवर झालेली ओळख महिलेला चांगलीच महागात पडली आहे. समाज कल्याण खात्याचा नाशिक येथे उपायुक्त असल्याचे सांगून सोन्याचे दागिने दोन तासात पॉलिश करून देतो असे सांगून महिलेची १२ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे.

याप्रकरणी सदाशिव पेठेत राहणाऱ्या महिलेने विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार फेसबुकवर अशोक भोसले नाव सांगणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेची फेसबुकवर एकाशी ओळख झाली. त्याने अशोक भोसले नाव असल्याचे सांगितले. तो समाज कल्याण खात्याच्या नाशिक येथे उपायुक्त असल्याचे भासवून विश्वास संपादन केला. तिच्याशी वारंवार चॅटिंग करून त्याने चांगल्याप्रकारे मैत्री करून विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याचेकडील १५ तोळे वजनाचे दागिने त्याने महिलेकडे सदाशिव पेठेत भेट घेऊन दिले. तसेच महिलेचे सोन्याचे दागिने दोन तासात पॉलीश करून दुकानातून आणून देतो असे सांगून तिचे १२ लाखांचे सोन्याचे दागिने घेऊन गेला.


मात्र, दोन तासानंतर देखील तो आला नाही. यानंतर फिर्यादी महिलेने आरोपीने दिलेले दागिने दुकानात जाऊन तपासणी केली असता, ते बनावट असल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एस. फरतडे करत आहेत.

# खडकवासला धरणातून खरीप आवर्तन

खडकवासला । प्रतिनिधी

धरणक्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे खडकवासला धरणातील पाणीसाठा ७० टक्क्यांवर पोहचला आहे. त्यामुळे रविवारपासून (दि. २१) धरणातून शेतीसाठी खरीप आवर्तन सोडण्यास सोडण्यास येणार असल्याचे जलसंपदा विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

दरम्यान, शनिवारी (दि. २०) सायंकाळी पाच वाजता खडकवासला धरणसाखळीत १३.२६ टीएमसी (४५.५० टक्के) इतका पाणीसाठा झाला होता. हवेली, दौंड, इंदापूर आदी तालुक्यांतील ६६ हजार हेक्टर शेतीला खरीप आवर्तनाच्या पाण्याचा लाभ मिळणार आहे. खडकवासला जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता मोहन भदाणे म्हणाले की, खडकवासला धरणातून रविवारपासून खरीप आवर्तन सोडण्यात येणार असून,



### नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्र्यांचे निर्देश

खडकवासला प्रकल्प, तसेच निरा धरणातून दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी पाणी सोडण्याची मागणी आमदारांनी केल्यानंतर खडकवासला प्रकल्पातून खरीप आवर्तन रविवारपासून सुरू करण्यात येणार आहे. त्या संदर्भात पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाटबंधारे विभागाला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निर्देश दिले. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती खडकवासला प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुन्हाडे यांनी दिली.

मुठा कालव्यात एक हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग केला जाणार आहे. त्यामुळे मुठा कालवा परिसरातील रहिवाशांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

धरणक्षेत्रात सध्या पाऊस पडत आहे. त्यामुळे वरील तिन्ही धरणांच्या आगोदर कमी क्षमतेचे खडकवासला धरण शंभर टक्के भरण्याची शक्यता आहे. धरणक्षेत्रात जोरदार पाऊस नसल्याने पाण्याची मोठी आवक नसली, तरी रिमझिम पावसामुळे पाणीसाठ्यात हळूहळू वाढ सुरू आहे. गेल्या २४ तासांत धरणसाखळीत ०.७२ टीएमसी पाण्याची भर पडली आहे.

शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता साखळीत १२.५४ टीएमसी पाणी होते. पानशेतपाठोपाठ वरसगाव धरणाचीही पन्नास टक्क्यांकडे वाटचाल सुरू आहे. खडकवासला धरणाची पाणी साठवणक्षमता केवळ १.९७ टीएमसी आहे. टेमघर, वरसगाव व पानशेत धरणांच्या भिंतीपर्यंत खडकवासलाचे पाणलोट क्षेत्र पसरले आहे. धरणक्षेत्रात सध्या रिमझिम पाऊस कायम आहे.

## जुने एमटी सिरीजचे कृष्णधवल मतदार ओळखपत्र असलेल्या मतदारांना नोंदणीचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

- जिल्ह्यात छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम-२०२४ जाहीर झाला आहे. बाहेरील जिल्ह्यातील जुने एमटी सिरीजचे कृष्णधवल मतदार ओळखपत्र असलेल्या आणि जिल्ह्याच्या मतदार नाव नसलेल्या मतदारांनी मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात सहभागी व्हावे आणि नव्याने मतदार नोंदणी करण्यासाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी काही मतदारांकडे एमटी सिरीजमधील जुने कृष्णधवल मतदार ओळखपत्र आढळून आले होते. या ओळखपत्राचा पुरावा म्हणून वापर करीत त्यांना मतदान करायचे होते. ते इतर जिल्ह्यातील असल्याने आणि पुणे जिल्ह्याच्या मतदार यादीत नाव नसल्याने त्यांना मतदान करता आले नाही. अशा मतदारांनी मतदार नोंदणीसाठी नव्याने अर्ज सादर करावा आणि जिल्ह्यातील संबंधित मतदारसंघात नोंदणी करावी.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आणि आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित हा कार्यक्रम जाहीर झाला आहे. पुनरीक्षण उपक्रमांतर्गत एकत्रिकृत प्रारुप मतदार यादी २५ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी २५ जुलै ते ९ ऑगस्ट २०२४ असा आहे. दावे व हरकती स्वीकारण्याच्या कालावधीमध्ये राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी निश्चित केलेल्या शनिवार आणि रविवारी विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहे.

# पतीने गॅस एजन्सीचे पैसे स्वत:च्या खात्यावर घेत नृत्यांगणांवर तीन कोटी ७४ लाख उधळले

**पुणे । प्रतिनिधी**

पत्नीच्या नावे असलेल्या गॅस एजन्सीचा आर्थिक व्यवहार पाहणाऱ्या पतीने एजन्सीला मिळणारे पैसे स्वतःच्या बँक खात्यावर घेतले. त्यातील तीन लाख रुपये पनवेल येथील नृत्यांगना आणि १० लाख रुपये सोने खरेदीसाठी दिले. यासह एकूण तीन कोटी ७४ लाख ७९ हजार ८४७ रुपयांचा अपहार केल्याबाबत पत्नीने गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १ एप्रिल २०२३ ते १५ मे २०२४ या कालावधीत महाळुंगे इंगळे येथे घडला.



हनुमंत रावसाहेब पोटे (वय ३१, रा. चिंबळी) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे. याप्रकरणी ३१ वर्षीय पत्नीने महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि फिर्यादी हे नात्याने पती-पत्नी आहेत. फिर्यादी यांच्या नावे असलेल्या ममता गॅस एजन्सीचा आर्थिक व्यवहार पाहण्याची मुभा घरजावई असलेले पती हनुमंत यांना दिली होती. हा व्यवहार पाहत असताना ग्राहकांकडून आलेले पैसे हनुमंत यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी स्वतःच्या बँक खात्यावर घेतले. त्यातील तीन लाख रुपये पनवेल येथील नृत्यांगना करीना राज व मुस्कान यांना दिले. १० लाख रुपयांचे सोने खरेदी करण्यासाठी आगाऊ रक्कम म्हणून दिली. यासह एकूण तीन कोटी ७४ लाख ७९ हजार ८४७ रुपयांचा(चरहरर्श्रीपसश) अपहार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. महाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

## गुंडाकडून बाप-लेकाला बेदम मारहाण

निरा : एका सराईत गुंडाने गावातील मुख्य चौकात दहशत निर्माण करत सातारा येथील रुग्णालयातून घरी निघालेल्या बाप-लेकाला जबर मारहाण केली. तसेच त्यांची दुचाकी पेटवून दिली. निरा (ता.पुरंदर) येथील पालखीतळासमोर व छत्रपती श्रीशिवाजी महाराज चौकात शुक्रवारी (दि.१९) रात्री ही घटना घडली.

याबाबत जखमी सचिन संपत कोरडे (रा. खंडोबाची वाडी, ता. बारामती) यांनी निरा पोलिसांत फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अक्षय दिलीप शेवाळे (रा.निरा, ता. पुरंदर) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. सचिन कोरडे यांचे वडील संपत कोरडे हे गंभीर आजाराने ग्रस्त आहेत. त्यांच्यावर सातारा (शेंद्रे) येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वडिलांना ट्रकमध्ये बसवून सचिन दुचाकीवरून निरेत आले. पालखीतळाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात ट्रक आल्यावर वडिलांना खाली घेत असताना अक्षय शेवाळे तेथे आला. त्याने शिवीगाळ, दमबाजी व धक्काबुक्की करीत सचिनच्या डोळ्यात लाल तिखट चटणी टाकली. त्यानंतर हत्याराने त्यांच्या डोक्यात जबर घाव घातला. सचिन जखमी झाल्याने दुचाकी तेथेच सोडून त्यांनी तेथून पळ काढला. त्यानंतर अक्षय याने त्यांच्या आजारी वडिलांवर हल्ला केला. तसेच त्यांची दुचाकी जाळून टाकली. शिवाजी चौकात पेटती दुचाकी पाहून स्थानिक भयभीत झाले. निरा पोलिस दूरक्षेत्राच्या कर्मचार्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. जखमी सचिन कोरडे यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# शैक्षणिक सुविधांसाठी निधी कमी पडू देणार नाही -दिलीप वळसे पाटील

**टाकळी हाजी । प्रतिनिधी**

दर्जेदार शैक्षणिक सुविधा ग्रामीण भागातील मुलांना मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या निधीची कमतरता भासू देणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले. पिंपरखेड (ता. शिरूर) येथील श्रीदत्त विद्यालयात पोलिस निरीक्षक जी. पी. दाभाडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कुटुंबीयांकडून शाळेसाठी बांधून देण्यात येणाऱ्या व्यासपीठाचे भूमिपूजन सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी वळसे पाटील यांनी शाळेसाठी अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी सुमारे ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मुले ही देशाचे भविष्य असून शिक्षणासाठी पायाभूत सुविधा कधीही कमी पडू देणार नाही, असेही वळसे पाटील म्हणाले. यावेळी विकास दाभाडे व योगेश दाभाडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना सुमारे ६० हजार रोख व दोन लाख रुपये किमतीच्या वह्या आणि ट्रॉफी देण्यात आल्या. याप्रसंगी माजी आमदार पोपटराव गावडे, शिरूर आंबेगाव राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, राजेंद्र गावडे, माजी सभापती प्रकाश पवार, सरपंच राजेंद्र दाभाडे, ग्रामविकास संस्थेचे अध्यक्ष अरुण ढोमे, विकास दाभाडे, योगेश दाभाडे, बिपिन थिटे, बाबाजी गावडे, संपत पानमंद, सवित्रा थोरात, बाबाजी निचित, रामदास ढोमे, गोपाळ दाभाडे, सतीश गोडसे, संचालक कैलास बोंबे, बालशिरम ढोमे, दिलीप बोंबे, शिवाजी बोंबे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अरुण ढोमे यांनी तर आभार दामोदर दाभाडे यांनी मानले.

## सोमेश्वरनगरला आज विज्ञान प्रदर्शन

**सोमेश्वरनगर । प्रतिनिधी**

श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ महाविद्यालयाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी (ता. २२) एक दिवसीय राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामध्ये राज्यातील साडेतीनशे प्रकल्पांची नोंदणी झाली आहे.

सोमेश्वर कारखाना संचलित सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ण्ड इंजिनिअरिंग, एमबीए कॉलेज, डिप्लोमा कॉलेज आणि सोमेश्वर विज्ञान महाविद्यालय यांच्या वतीने सलग चौथ्या वर्षी 'सोमेश्वर टेक्नॉथॉन २ज्ञ२४' हे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित केले आहे. प्रदर्शनात पाचवी ते आठवी, नववी ते बारावी आणि महाविद्यालयीन असे तीन गट करण्यात आले आहेत. त्यामध्ये विज्ञान संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर करायचे आहेत. आत्तापर्यंत वेगवेगळ्या जिल्ह्यातील साडेतीनशे प्रकल्पांची नोंदणी झाली आहे. तिन्ही गटात मिळून तीन लाखांची बक्षीसे दिली जाणार आहेत. सोमवारी सकाळी दहा वाजता तंत्रशिक्षण मंडळाचे सहसंचालक डी. व्ही. जाधव यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. याप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर प्रदर्शनास विविध शाळा-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भेट द्यावी, असे आवाहन शिक्षण मंडळाचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी केले आहे.

# पुण्यात चालणार मनपाचा बुलडोझर...८५ घर मालकांना बजावली नोटीस! नागरिकांची वाढली चिंता

**पुणे । प्रतिनिधी**

नाला, पावसाळी वाहिन्यांवर घरे बांधणाऱ्या कलवड वस्तीमधील ८५ जणांना महापालिका बांधकाम विभागाने नोटीस दिल्या आहेत. राहत्या घराना नोटीस आल्याने रहिवासी भयभीत झाले होते. मात्र आमदार सुनील टिंगरे यांनी मध्यस्थी करत महापालिका अधिकाऱ्यांना वस्तीमध्ये आणून रहिवाशांच्या घरांवर कारवाई न करता पावसाचे पाणी चारही दिशांना बंद पाईपलाइनद्वारे नेऊन पुढे नाल्यात सोडावे अशा सूचना महापालिका अधिकाऱ्यांना केल्या. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

कलवड वस्तीची पाहणी करण्यासाठीं आमदार सुनील टिंगरे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहिदास गव्हाणे, येरवडा क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक महापालिका आयुक्त चंद्रसेन




नागटिळक, कनिष्ठ अभियंता नितिन चांदणे, सुहास अलबर यांसह अधिकारी, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागील पावसात कलवडमध्ये पूर परिस्थती निर्माण होऊन नागरिकांच्या घरात मोठ्या प्रमाणावर पाणी गेले होते. सखल भागांत सुमारे १० फूट पाणी साचले होते. यावेळी प्रचंड नुकसान झाले होते. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी आंदोलन करून महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले होते. काही दिवसांनी महापालिका बांधकाम विभागाने नाला, पावसाळीवाहिन्या, सांडपाणी वाहिन्यांवर घरे बांधणाऱ्या सुमारे ८५ जणांना स्वतःहून अतिक्रमण काढून घ्या, अन्यथा कारवाई करू अशी नोटीस दिल्यानंतर कारवाईच्या भीतीने नागरिक प्रचंड घाबरले होते. रहिवाशांनी आमदार सुनील टिंगरे यांची भेट घेउन घरे वाचवण्याची विनंती केली.

आमदार सुनील टिंगरे यांनी महापालिका अधिकाऱ्यांसह पाहणी दौरा करून घरे वाचवून उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार कलवड भागांत लोकप्रतिनिधी, अधिकारी यांनी पाहणी केली. आमदार टिंगरे यांनी कलवडमधून सखल भाग असलेल्या भागातून पाण्याचा निचरा करण्याच्या मलनिसांरण विभागाला सूचना देऊन काम करण्याच्या सूचना केल्या. घरांवर कारवाई होणार नसल्याने नागरिकानी मात्र समाधान व्यक्त केले. आमदार टिंगरे म्हणाले, गेली अनेक वर्षे नागरीक या परिसरात वास्तव्य करत आहेत. नाला, पावसाळीवाहिन्यावर जर बांधकामे झाली असतील, तर त्याच वेळी बांधकाम करताना महापालिकेने ते थांबविणे आवश्यक होते. आता राहत असलेल्या घरांवर कारवाई करून नागरिकांना बेघर न करता पावसाळी लाइन टाकता येतात हे अधिकाऱ्यांना जागेवर आणून दाखवून दिले. त्यानुसार काम करण्याचा सूचना केल्या.

बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहिदास गव्हाणे म्हणाले, मलनि:सारण विभागाला लाइन टाकण्यासाठी जेवढे अतिक्रमण काढायचे होते तेवढे बांधकाम विभागाने काढले आहे. पावसाळी वाहिन्या टाकण्यासाठी अडथळा ठरणारे आणखी काही अतिक्रमण जर काढावे लागत असेल तर काढावे लागणार आहे. मलनि:सारण विभागाचे अभियंता सुहास अलबर म्हणाले, आमदारांनी दाखवल्याप्रमाणे पाण्याचा निचरा होतो का याचा सर्व्हे करून काम केले जाईल.

## अण्णा भाऊ साठे संस्थेतर्फे व्याख्यानमालेचे आयोजन

**धनकवडी । प्रतिनिधी**

''राजर्षी शाहू महाराजांनी मातंग समाजाला जगाच्या टोकावर नेऊन ठेवले,'' असे मत बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापन अधिकारी डॉ. संभाजी बिरांजे यांनी व्यक्त केले. दलित स्वयंसेवक संघ व अण्णा भाऊ साठे स्मारक संस्थेतर्फे आयोजित व्याख्यानमाला पुष्प-४०८ वे मध्ये 'राजर्षी शाहू महाराज व मातंग समाज-एक मुक्त चिंतन' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दलित स्वयंसेवक संघाचे संघप्रमुख राजू धडे हे होते. या वेळी सोपानराव चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिक सुभा लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष नाना मोरे, लक्ष्मण लोंढे, महानंदा डाळिंबे, प्रदेश प्रवक्ते सुजित रणदिवे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर सदाशिव भिसे यांच्या शाहिरी, प्रबोधन गीताने व लक्ष्मण रिठे यांच्या क्लोरोनेट वादनाने झाली. प्रास्ताविक सुजित रणदिवे यांनी केले. उर्मिला पवार यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. त्यानंतर डॉ. लिखित 'राजर्षी शाहू व डॉ. आंबेडकर-समग्र पत्रव्यवहार' या पुस्तकाचे प्रकाशन साहित्यिक दादासाहेब सोनवणे यांच्या हस्ते झाले. कावेरी जाधव यांनी आभार मानले.